cmyk

## संपादकीय

### युरोपचा आगडोंब; जगासाठी धोक्याची घंटा!

एकेकाळी सौम्य उन्हाळा, आल्हाददायक हवामान आणि समशीतोष्ण वातावरणासाठी ओळखला जाणारा युरोप आज अभूतपूर्व उष्णतेच्या लाटेने होरपळून निघत आहे. फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, स्पेन, इटली, डेन्मार्क आणि स्वित्झर्लंडसारख्या देशांमध्ये तापमानाने दशकांतील विक्रम मोडले आहेत. काही ठिकाणी पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला असून रस्ते वितळणे, रेल्वे रुळ वाकणे, जंगलांना लागलेले वणवे आणि उष्माघातामुळे होणारे मृत्यू ही दृश्ये युरोपच्या इतिहासात अभूतपूर्व मानावी लागतील. ही केवळ एका खंडाची आपत्ती नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी धोक्याची घंटा आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०३ | शुक्रवार दि.०३ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### ४.९७ लाख दिव्यांग लाभार्थ्यांना आर्थिक मदत

पुणेः राज्यातील विशेष साहाय्य योजनांचा लाभ घेणार्या ४ लाख ९७ हजार दिव्यांग लाभार्थ्यांपैकी ६० हजार जणांकडे अजूनही युनिक डिसॅबिलिटी आयडी (यूडीआयडी) कार्ड नसल्याची बाब समोर आली आहे. याशिवाय १ लाख २० हजार लाभार्थ्यांची यूडीआयडी कार्ड मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ३ लाख १७ हजार लाभार्थ्यांकडेच वैध यूडीआयडी कार्ड उपलब्ध आहे. दरम्यान, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तिवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना या तीन योजनांच्या माध्यमातून एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत सुमारे २४५ कोटी रुपये राज्यातील दिव्यांग नागरिकांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. दिव्यांग सक्षमीकरण विभागाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विशेष साहाय्य योजनांच्या निधीवितरणास मंजुरी दिली असून, पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटीद्वारे अर्थसाहाय्य जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

### डॉ.शरद गोरे यांच्या कार्याची 'वर्ल्ड बुक'मध्ये नोंद

पुणेः अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या अतुलनीय आणि ऐतिहासिक साहित्यिक कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाच्या 'वर्ल्ड बुक' मध्ये त्यांच्या या अथांग कार्याची जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे. गेल्या ३३ वर्षांपासून मायमराठीच्या संवर्धनासाठी अविरत झटणाऱ्या डॉ. गोरे यांच्या या बहुमानामुळे संपूर्ण मराठी जगतातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. साहित्य विश्वात डॉ. शरद गोरे हे एकमेव असे व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून आजवर तब्बल १९६ मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. कोणत्याही अनुदानावर अवलंबून न राहता ही सर्व संमेलने केवळ लोकवर्गणीतून पार पडली आहेत.

### मुंबईत मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू

मुंबई : मुंबईतील साकीनाका परिसरातील खैरानी रोडवर उघड्या मॅनहोलमध्ये पडलेल्या अस्लम शेख नावाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. साडेतीन तास या व्यक्तीला वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मात्र शेवटी त्या व्यक्तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. काही दिवसांपूर्वीच महापौरांच्या डोळ्यांदेखत एक अधिकारी मॅनहोलमध्ये पडल्याची घटना ताजी असताना, साकीनाक्यामध्ये मोठी दुर्घटना घडली. अस्लम शेख मॅनहोलमध्ये पडल्याचे लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली पोलिस प्रशासन आणि अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. साडेतीन तासांचे शर्थीचे प्रयत्न करूनही अस्लम शेख यांना वाचवता आले नाही. बऱ्याच प्रयत्नांनंतर शेवटी अस्लम शेख यांचा मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवण्यात आला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०२ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.५० क्विंटल | २,३९० | २,६२० | २,५१२ |
| ज्वारी/हायब्रिड: ११५.५० क्विंटल | १,७०० | ४,६०० | २,८८७ |
| मका/लोकल: ५२.५० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : ६.५० क्विंटल | ५,००० | ७,३०० | ६,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: ७२.०० क्विंटल | २,४४० | ३,००० | २,६३५ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,२०० | ५,३९१ | ४,९८७ |

# निर्यातबंदीमुळे ऊस उत्पादकांची चिंता वाढली; राज्य सरकारची केंद्राकडे धाव

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील २०० हून अधिक खासगी आणि सहकारी साखर कारखाने कार्यरत असताना, २०२५-२६ च्या गाळप हंगामात विक्रमी साखर उत्पादन झाले आहे. मात्र, केंद्र सरकारने साखर निर्यातीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचा मुद्दा विधानपरिषदेत उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) वाढविणे, इथेनॉलचा दर आणि कोटा वाढविणे यासह विविध मागण्यांसाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती दिली.**



राज्यातील साखर उद्योगाच्या समस्यांबाबत आमदार सदाशिव खोत, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके आणि उमा खापरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला लेखी उत्तर देताना सहकारमंत्री पाटील यांनी स्पष्ट केले की, साखर निर्यातीचे धोरण हे पूर्णपणे केंद्र सरकारच्या अखत्यारित येते. केंद्र सरकारने १३ मे २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार साखरेच्या निर्यातीवर तत्काळ प्रभावाने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत बंदी घातली आहे. केंद्राची ही बंदी पुढेही वाढण्याची शक्यता असल्याने राज्यातील साखर उद्योग, ऊस उत्पादक शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी चिंता सदस्यांनी व्यक्त केली. यावर राज्य सरकारने केंद्राकडे कोणत्या उपाययोजना आणि पाठपुराव्याची भूमिका घेतली आहे, अशी विचारणा करण्यात आली होती. यासंदर्भात सहकारमंत्री पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २४ मार्च २०२६ रोजी राज्यातील साखर उद्योगाच्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली होती. या बैठकीत केंद्र सरकारच्या अखत्यारितील विविध मागण्यांबाबत राज्याचे शिष्टमंडळ दिल्लीत जाऊन चर्चा करेल, असा निर्णय घेण्यात आला होता. ▶▶ पान २ वर


# माहिती अधिकार कायद्यातील बदलांना स्थगिती !

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पुढाकार, अण्णा हजारेंच्या मागण्यांची दखल

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या अत्यंत वादग्रस्त बदलांना अखेर राज्य सरकारने तूर्तास स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात पुकारलेल्या आंदोलनाची आणि मागण्यांची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट पुढाकार घेतला. मुख्य माहिती आयुक्तांनी हे बदल स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे माहिती अधिकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि अण्णा हजारे यांच्या लढ्याला मोठे यश आले आहे.**

अण्णा हजारे उपोषणावर ठाम राहिल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या विषयात मध्यस्थी केली. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला थेट एक पत्र पाठवले. या पत्रामध्ये त्यांनी स्पष्ट नमूद केले की, ''ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याशी या संदर्भात सविस्तर चर्चा केल्याशिवाय माहिती अधिकार कायद्यात कोणताही




बदल किंवा निर्णय घेणे उचित ठरणार नाही.'' मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या महत्त्वाच्या विनंतीनंतर आणि त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे राज्य मुख्य माहिती आयोगाने १२ जून रोजी राजपत्रात प्रकाशित केलेल्या सर्व बदलांना स्थगिती दिली आहे. दरम्यान, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील फडणवीस सरकारला उपोषणाचा इशारा दिला होता. शासनाने १२ जून रोजी माहिती अधिकार कायदा २००५ संदर्भात सुधारित अधिसूचना जारी केली आहे. मात्र, त्यास सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला आहे. या कायद्यानुसार ▶▶ पान २ वर

# कर्जमाफी होणार नसल्याच्या भीतीनेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या

मुंबई । प्रतिनिधी

सरकार शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करणार नाही. आम्ही सरसकट कर्जमाफीची मागणी करत आहोत. पण सरकारने अटी लावल्या आहेत. यामुळे आपली कर्जमाफी होणार नाही या भीतीनेच राज्यातील शेतकरी आत्महत्या करत आहेत, असा गंभीर आरोप काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी गुरुवारी (दि. २ जुलै) विधानसभेत केला.



शेतकरी प्रश्नांवर तातडीने सर्व कामकाज बाजूला ठेवून स्थगन प्रस्तावावर विस्तृत चर्चा करण्याची मागणी त्यांनी केली. पण सुरुवातीलाच तालिका अध्यक्षांनी सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना परवानगी नाकारण्यात येत असल्याचे स्पष्ट केले होते. यावेळी पटोले यांनी कृषी दिनी लातूर जिल्ह्यातील दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आणून दिले. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील ▶▶ पान २ वर

# एसटीचे एकाचवेळी ११ अधिकारी निलंबित

नाशिक । प्रतिनिधी

एसटी महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयात एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी कारवाई करण्यात आली आहे. कामात प्रचंड हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत महामंडळाने ११ अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केले आहे.

या धडक कारवाईमुळे एसटी महामंडळात एकच खळबळ उडाली असून, कामचुकार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. विशेष म्हणजे, निलंबित झालेल्यांमध्ये 'क्लास वन' श्रेणीतील ३ बड्या अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात भीतीचे वातावरण पसरले आहे. एसटी



महामंडळाने गेल्या काही काळात प्रवासी भाड्यात वाढ केली होती. असे असूनही, नाशिक विभागातील प्रवासी उत्पन्न वाढण्याऐवजी गेल्या दोन हंगामात (सिझन) कमालीचे घटले होते. भाडेवाढ होऊनही उत्पन्न का बुडत आहे? याचा शोध घेण्यासाठी १० जून रोजी एसटी महामंडळाच्या मुख्य कार्यालयातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या समितीने नाशिक विभागाचे अचानक निरीक्षण (इन्स्पेक्शन) केले. ▶▶ पान २ वर

# बीडमधील भूसंपादन मावेजा प्रकरण विधानसभेत गाजले

## आरोपींकडून ७३ कोटी वसूल करणार, चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या धुळे-सोलापूर महामार्गामधील बीड जिल्ह्यातील भू संपादनाखाली अवैधरित्या वितरीत करण्यात आलेली ७३ कोटी रुपयांची रक्कम वसूल करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितले.**

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनाच्या 'मावेजा' वाटपात झालेल्या




गैरव्यवहारासंदर्भात सदस्य काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या धुळे-सोलापूर महामार्गामधील बीड जिल्ह्यातील संपादनाखालील जमिनीशी निगडीत लवाद आदेशासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या बदलीनंतर जुन्या तारखा टाकून तत्कालीन लवाद ▶▶ पान २ वर

# जातीवादी पोस्ट टाकून सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या ज्ञानेश्वर लांडेला अटक

बीड । प्रतिनिधी

**सोशल मीडियावर एका विशिष्ट समाजाविषयी तसेच त्या समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह आणि अश्लील मजकूर प्रसारित करून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा तसेच सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात आरोपी ज्ञानेश्वर महादेव लांडे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात बीड पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधित आरोपीला अटक केली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (२ जुलै) सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीला एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये प्रसारित झालेला व्हिडिओ आढळून आला. हा व्हिडिओ आरोपी ज्ञानेश्वर महादेव लांडे (वय ३०, रा. घाटसावळी, ता. जि. बीड, सध्या रा. पेरणे फाटा, पुणे) याने आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर तयार करून अपलोड केल्याचे तपासात समोर आले. सदर व्हिडिओमध्ये आरोपीने एका विशिष्ट समाजाबाबत तसेच त्या समाजातील महिलांविषयी अवमानकारक, अश्लील आणि आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. ▶▶ पान २ वर

# ठाणेदारासह ९ पोलिसांना जन्मठेप

वाशिम । प्रतिनिधी

वाशिम जिल्हा न्यायालयाने आज, २ जुलै २०२६ रोजी एका ऐतिहासिक निकालात रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार एम.एम. धांडे यांच्यासह ९ पोलीस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. पोलीस कोठडीत बेग्या पवार याच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी राज्याच्या इतिहासात एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने पोलिसांना जन्मठेप होण्याची ही पहिलीच घटना आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याच्या पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. ▶▶ पान २ वर

# महिला शेतकऱ्यांना 'शेतकरी' म्हणून सन्मानाची ओळख

## ना.पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात बोलतांना विधेयकाचे केले स्वागत

मुंबई । प्रतिनिधी

दिवसरात्र शेतात राबणाऱ्या महिलांना आतापर्यंत बिनपगारी कामगारासारखी वागणूक मिळाली; मात्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकामुळे त्यांना 'शेतकरी' म्हणून सन्मानाची ओळख मिळणार असून, त्यांच्या आत्मविश्वासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.




विधानसभेत महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना मुंडे बोलत होत्या. शहरात नोकरी करणारी महिला जशी 'वर्किंग वुमन' आहे, त्याचप्रमाणे घर आणि शेतीची दुहेरी जबाबदारी सांभाळणारी ग्रामीण महिलाही तितकीच 'करिअर वुमन' असल्याचे त्यांनी सांगितले. बळीराजाच्या मागे उभी असलेल्या अन्नपूर्णेला ओळख देण्याचे काम या विधेयकातून होत असल्याचे सांगत त्यांनी विधेयकाचे स्वागत केले. महिलेला ▶▶ पान २ वर

# राम मंदिर दान चोरी प्रकरण : आरोपीच्या घरातून क्यूआर असलेली देणगी पेटी हस्तगत

अयोध्या । वृत्तसंस्था

**कथित श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणातील एका आरोपीच्या घरातून रामराज्य कोष असे लिहिलेली आणि डिजिटल पेमेंटसाठी क्यूआर कोड लावलेली एक देणगी पेटी हस्तगत करण्यात आली आहे. या हायप्रोफाईल तपासात आतापर्यंतचा हा अत्यंत महत्त्वाचा पुरावा मानला जात आहे.**

अयोध्या येथील श्रीराम मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या देणग्यांच्या कथित अपहाराबाबत विशेष तपास



पथकाने आपला तपास तीव्र केला असताना, आरोपी अविनाश शुक्ला याच्या घराच्या झडतीदरम्यान ही लाकडी पेटी हस्तगत करण्यात आली. हस्तगत केलेली रामराज्य कोष पेटी ही कथित कार्यपद्धती सिद्ध करण्यासाठी आणि एसआयटी आपले निष्कर्ष न्यायालयात सादर करण्यापूर्वी या गुन्ह्यात सामील असलेल्या सर्वांची ओळख पटवण्यासाठी एक महत्त्वाचा पुरावा ठरू शकते. या जप्तीमुळे मंदिराच्या नावावर कोणतीही अनधिकृत देणगी गोळा करणारी यंत्रणा चालवली जात होती का, हे शोधण्यास आणि डिजिटल व्यवहारांशी जोडलेल्या क्यूआर कोडद्वारे पैशांच्या ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# युरोपचा आगडोंब; जगासाठी धोक्याची घंटा !

एकेकाळी सौम्य उन्हाळा, आल्हाददायक हवामान आणि समशीतोष्ण वातावरणासाठी ओळखला जाणारा युरोप आज अभूतपूर्व उष्णतेच्या लाटेने होरपळून निघत आहे. फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, स्पेन, इटली, डेन्मार्क आणि स्वित्झर्लंडसारख्या देशांमध्ये तापमानाने दशकांतील विक्रम मोडले आहेत. काही ठिकाणी पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला असून रस्ते वितळणे, रेल्वे रुळ वाकणे, जंगलांना लागलेले वणवे आणि उष्माघातामुळे होणारे मृत्यू ही दृश्ये युरोपच्या इतिहासात अभूतपूर्व मानावी लागतील. ही केवळ एका खंडाची आपत्ती नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी धोक्याची घंटा आहे.

फ्रान्समध्ये उष्णतेच्या लाटेमुळे हजारो नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, यामध्ये बहुसंख्य ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असून अनेकांचा मृत्यू घरातच झाला. ब्रिटनमध्ये सलग 'रेड वॉर्निंग' जारी करण्याची वेळ आली, तर स्पेनमध्ये विक्रमी तापमान आणि वणव्यांनी जनजीवन विस्कळीत केले. जर्मनी आणि डेन्मार्कसारख्या थंड हवामानाच्या देशांनाही विक्रमी उष्णतेचा सामना करावा लागत आहे. यावरून हवामान बदलाचे संकट आता केवळ उष्ण कटिबंधापुरते मर्यादित राहिलेले नसून पृथ्वीवरील प्रत्येक प्रदेशाला त्याचा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या भीषण परिस्थितीमागे जागतिक तापमानवाढ हेच सर्वात मोठे कारण आहे. औद्योगिक क्रांतीनंतर जीवाश्म इंधनांचा अतिरेकी वापर, बेसुमार जंगलतोड, अनियंत्रित नागरीकरण आणि हरित क्षेत्राचा होत चाललेला ऱ्हास यामुळे वातावरणात हरितगृह वायूंचे प्रमाण झपाट्याने वाढले. परिणामी पृथ्वीवरील उष्णता अडकून राहू लागली आणि हवामानाचे नैसर्गिक संतुलन बिघडले. आज युरोपमध्ये दिसणारा आगडोंब हा याच मानवनिर्मित संकटाचा परिणाम आहे. 'वर्ल्ड वेदर ॲट्रिब्युशन' संस्थेच्या अहवालानुसार, युरोपातील सध्याची उष्णतेची लाट हवामान बदलाशिवाय शक्यच नव्हती. पाच दशकांपूर्वी अशा प्रकारची घटना जवळपास अशक्य मानली जात होती; मात्र आता तिची शक्यता तब्बल २०० पट वाढली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान तज्ज्ञांनीही या संकटाकडे तातडीने लक्ष देण्याचा इशारा दिला आहे. विज्ञानाचा हा स्पष्ट इशारा दुर्लक्षित करणे म्हणजे भविष्यातील अधिक मोठ्या विनाशाला निमंत्रण देणे होय.

युरोपची परिस्थिती भारतासाठीही इशारा देणारी आहे. गेल्या काही वर्षांत भारतात अवकाळी पाऊस, ढगफुटी, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित मान्सून यांचे प्रमाण वाढले आहे. शेती, जलस्त्रोत, आरोग्य आणि अर्थव्यवस्था या सर्व क्षेत्रांवर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानातील सर्वात मोठा प्रश्न बनला आहे.

पॅरिस हवामान करारानंतर जगाने कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे, हरित ऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे आणि पर्यावरण संरक्षणाचे अनेक संकल्प केले. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक देश अपयशी ठरले. आर्थिक विकासाच्या स्पर्धेत पर्यावरणाला दुय्यम स्थान देण्याची चूक आज महागात पडत आहे. आता तरी नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे, वृक्षसंवर्धन, प्रदूषणावर कठोर नियंत्रण आणि शाश्वत विकासाची दिशा स्वीकारणे ही काळाची गरज आहे. युरोपमधील उष्णतेचा आगडोंब हा केवळ हवामानाचा बदल नाही; तो मानवाच्या बेफिकीर विकास मॉडेलचा परिणाम आहे. निसर्गाचे नियम मोडून प्रगतीचा पाठलाग करणाऱ्या जगाला आता निसर्गच कठोर इशारा देत आहे. हा इशारा वेळेत समजून घेतला, तरच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी निर्माण करता येईल. अन्यथा आज युरोपमध्ये धगधगणारा हा आगडोंब उद्या संपूर्ण जगाला भस्मसात करण्यास वेळ लागणार नाही.

# बीडच्या मल्टिस्टेट बँक घोटाळ्यातील पीडित ठेवीदारांना न्याय मिळवून देणार; आ.क्षीरसागर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## शिक्षकांच्या मागण्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांना निवेदन; तर बीडच्या पाणीप्रश्नासाठी जलसंपदा मंत्र्यांची घेतली भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात मागील काही वर्षांत अनेक मल्टिस्टेट बँका बुडाल्यामुळे हजारो सामान्य ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. आयुष्यभराची जमापुंजी गमावलेल्या नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि अस्वस्थता असल्याने आता या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी पाऊल उचलले आहे. या गंभीर विषयावर नुकतीच विधानसभेत आ. सुरेश धस यांनी प्रभावीपणे आवाज उठवला होता. याच पार्श्वभूमीवर, आ.सुरेश धस यांच्या समवेत आ. संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून लवकरच विशेष बैठक घेण्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे.**

संबंधित बँकांचे चेअरमन आणि संचालक मंडळ यांची मालमत्ता जप्त करून, त्यातून सभासदांचे आणि सामान्य ठेवीदारांचे अडकलेले पैसे परत मिळावेत, अशी ठाम मागणी आम्ही केली आहे. सामान्य ठेवीदारांना त्यांच्या कष्टाच्या पैशाचा प्रत्येक रुपया परत मिळालाच पाहिजे ही माझी स्पष्ट भूमिका असल्याचे असे आ. क्षीरसागर यांनी सांगितले. राज्यातील खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सध्या ऐरणीवर आले आहेत. टप्पा अनुदान, संच मान्यतेचा विषय, पेन्शन,



वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना आणि निवृत्तीचे वय अशा विविध मागण्यांसाठी शिक्षकांचे आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे.या आंदोलनाची दखल घेत आ. संदीप क्षीरसागर यांनी आ.रोहित पवार यांच्या समवेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. या प्रसंगी भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाचे संचालक तथा माजी आमदार सुनील भुसारा हे देखील उपस्थित होते. शिक्षकांच्या या रास्त मागण्यांवर शासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. बीड विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आणि नागरिकांच्या दीर्घकालीन पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी एक नवा आणि अधिक परिणामकारक पर्याय जलसंपदा विभागासमोर ठेवला आहे. टुकूर (खांडेपारगाव) साठवण तलाव या मंजूर प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता रद्द करून, त्याऐवजी बीड तालुक्यात प्रस्तावित नऊ कोल्हापुरी पद्धतीच्या साखळी बंधाऱ्यांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. जलसंधारण, भूजल पातळीत वाढ, सिंचन क्षमता आणि शेतकऱ्यांना वर्षभर पाण्याची उपलब्धता या दृष्टीने मोठ्या साठवण तलावापेक्षा साखळी बंधाऱ्यांचा हा पर्याय अधिक उपयुक्त आणि परिणामकारक ठरेल, असा आमचा विश्वास आहे. बीडच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी उपाय आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी माझा हा पाठपुरावा यापुढेही सातत्याने सुरू राहील. विकासासाठीचा हा निर्धार अखंड असल्याचे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे.


# रिक्षा चालकांना खाकी गणवेश वाटप,गणवेश वापरणे बंधनकारक




**मंठा । प्रतिनिधी**

**पोलीस ठाणे मंठा येथे शहरातील रिक्षाचालक युनियनच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक गुरुवार ता. २ रोजी आयोजित करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित व नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

सर्व रिक्षाचालकांना भविष्यात एकसमान खाकी रंगाचा गणवेश परिधान करणे बंधनकारक राहील, अशा सूचना देण्यात आल्या. एकसमान गणवेशामुळे रिक्षाचालकांची सहज ओळख होण्यास मदत होईल, प्रवाशांचा विश्वास वाढेल तसेच शहरातील वाहतूक व्यवस्थेत अधिक शिस्त निर्माण होईल असे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी सांगितले. पोलीस निरीक्षक श्री देशमुख यांच्या हस्ते १२ रिक्षाचालकांना खाकी गणवेशाचे वाटप करण्यात आले. गणवेश स्वीकारलेल्या रिक्षाचालकांनी भविष्यात नियमितपणे गणवेशाचा वापर करून वाहतुकीचे नियम पाळण्याची व नागरिकांना नम्र व सुरक्षित सेवा देण्याची ग्वाही दिली. तसेच बैठकीत रिक्षाचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वाहनांची आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, वाहनामध्ये आवश्यक ती सुरक्षा साधने उपलब्ध ठेवणे, प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वर्तन करणे, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास न देणे, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, तसेच कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, अशा विविध महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. बैठकीच्या शेवटी उपस्थित रिक्षाचालकांनी पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले. पोलीस प्रशासन व रिक्षाचालक यांच्या समन्वयातून शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.



# वसंतराव नाईकांनी राज्यात हरितक्रांती घडवली-राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

**सर्वसामान्य शेतकऱ्याच्या घरामध्ये जन्म घेणाऱ्या वसंतराव नाईक साहेबांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडविण्याचे काम केले, असे प्रतिपादन शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केले.**

पुढे बोलताना आमटे म्हणाले की, पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. हरितक्रांतीचे नव्हे तर शेतक्रांती व सर्वसामान्य मजुरांकरिता रोजगार हमी योजना आणली. महाराष्ट्रात हरितक्रांती, श्वेतक्रांती, रोजगार हमी, पंचायतराज यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न त्यांच्या काळात झाला. वसंतरावजी नाईक यांनी महाराष्ट्रामध्ये हरितक्रांती घडून आणली म्हणून च त्यांचा जन्मदिवस हा कृषी दिन म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो. महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने वसंतराव नाईक यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी शेतकरी हक्का मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, रामधन जमाले, हनुमान घोडके, डॉ.शेंडगे, माऊली परसकर, दादा सपकाळ, कोठेकर बाबू, दिगंबर सपकाळ, दादा परसकर सह आदी उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या वतीने नूतन गटविकास अधिकारी यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी**

**परतूर तालुक्यात आपल्या कार्यक्षमतेने, प्रामाणिकपणाने आणि दूरदृष्टीने विकासकामांना गती देणारे नूतन डॅशिंग गटविकास अधिकारी कौशल पाटील परतूर येथे पदभार स्वीकारला असून त्यांचा सन्मान सत्कार करण्यात आला असून गटविकास अधिकारी कौशल पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की ग्रामीण भागातील विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी, करून नागरिकांच्या समस्यांचे तत्परतेने समस्या सोडण्याचा माझा प्रयत्न राहील.**

त्यांच्या नेतृत्वाखाली विविध विकास योजनांची यशस्वी अंमलबजावणी करणार असा शब्द कौशल पाटील यांनी दिला, कार्यतत्पर आणि दूरदृष्टी असलेल्या गटविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते उल्लेखनीय कार्य होव्ये या साठी त्यांना मनःपूर्वक अभिनंदन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले, त्या सत्कार बैठकीत उपस्थित, परतूर पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लालझरे, उपाध्यक्ष पवन राशनकर,(पत्रकार) रवि भद्रगे,(पत्रकार)अनिल पांजगे, रामप्रसाद कसाब,आनंद भारसाकळे, सुखदेव घोडे,परमेश्वर पाईकराव, विठ्ठलदादा भारसाकळे,अशोक साबळे,परमेश्वर जाधव, संपत हिवाळे,इत्यादी उपस्थित होते

# पान १ वरून...

## निर्यातबंदीमुळे ऊस उत्पादकांची

यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २७ मे २०२६ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांसमोरील अडचणी, साखरेचा एमएसपी वाढविणे, इथेनॉलचा दर आणि कोटा वाढविणे तसेच उद्योगाला दिलासा देणाऱ्या विविध मागण्या केंद्र सरकारसमोर मांडण्यात आल्या. या सर्व मागण्यांवर केंद्र सरकारकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय सहकार मंत्र्यांनी दिल्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानपरिषदेत दिलेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे.

---------------

## कर्जमाफी होणार नसल्याच्या

सोनखेड आणि जामगा येथे कर्जबाजारीपणामुळे आणि कथित खासगी सावकारीच्या जाचामुळे दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही खूप गंभीर बाब आहे. राज्यातील अन्नदात्या शेतकऱ्याला विधिमंडळ अधिवेशनाचे कामकाज सुरु असतानाच आत्महत्या करावी लागत आहे. लागोपाठ सात दिवसांत सात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. राज्याचे सहकारमंत्री हे लातूर जिल्ह्यातील असून, त्यांच्याच्या जिल्ह्यात या घटना घडल्या आहे. एकीकडे सावकाराच्या जाचामुळे चंद्रपूर जिल्ह्यात किडन्या विकाव्या लावल्या जातात तर दुसरीकडे सहकारमंत्र्यांच्या लातूर जिल्ह्यामध्ये सावकारी जाचामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत, असे ते म्हणाले.

---------------

## माहिती अधिकार कायद्यातील

आतापर्यंत माहिती अधिकार कायद्याचा वापर करून माहिती मागवताना होणारा १० रुपयाचा खर्च होता, मात्र आता तो खर्च ३० रुपयांवर गेला आहे. यासोबतच प्रथम अपील ५० रुपये तर दुसऱ्या अपिलासाठी शंभर रुपये शासनाकडे जमा करावे लागणार आहेत. मिळालेल्या माहितीसाठी प्रतिपान दोन रुपयावरून प्रतिपान पाच रुपये इतकं शुल्क संबंधित विभागाकडून आकारला जाणार आहे. या नियमासह एकूण १२ नियमात बदल करण्यात आले आहेत. या नियमांमुळे सामान्य नागरिकांना माहिती मिळवणे अशक्य होणार आहे. माहिती अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, पैसे कमावण्याचे साधन नाही. काही लोक याचा गैरफायदा घेतात, त्यामुळे शुल्क आकारणं गरजेचे आहे. मात्र, यातून पैसे कमावणे हा उद्देश नसावा असे अण्णांनी म्हटले होते. फडणवीस सरकारने केलेले बदल पुन्हा पूर्ववत केले नाही, तर आपण उपोषण करणार असल्याचे देखील अण्णा हजारे यांनी म्हटले होते.

------------

## बीडमधील भूसंपादन मावेजा

तथा जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करुन लवाद आदेश निर्गमित केलेल्या प्रकरणामधील फिर्यादीवरून तत्कालीन जिल्हाधिकारी पाठक यांना ७ मे, २०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. यासंदर्भातील एकूण १५४ मूळ प्रकरणामधील निवाड्याची रक्कम रुपये ६८.५८ कोटी वरून लवादाने ३१०.२० कोटीपर्यंत वाढ केल्याचे; तसेच त्यापैकी ७३ कोटी रुपये संबंधित भूधारकांना भूसंपादन जायकवाडी प्रकल्प व उपविभागीय अधिकारी, बीड कार्यालयाकडून वाटप झाल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्याचे निलंबन करण्यात आले असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत या ७३ कोटी रुपयांची वसुली करण्यात येणार असल्याचे सांगितले. पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग अधिनियमांतर्गत भूसंपादनाचा मोबदला संबंधित भूधारकाची मालकी हक्काशी संबंधित तसेच बँक खात्याशी निगडीत कागदपत्रांची छाननी केल्यानंतरच केंद्र शासनाच्या भूमिराशी पोर्टल मार्फत वाटप केला जातो असे सांगितले. या चर्चेत सदस्य बबनराव लोणीकर यांच्यासह अन्य सदस्यांनी सहभाग घेतला.

--------------

## एसटीचे एकाचवेळी ११

या समितीत माहिती तंत्रज्ञान महाव्यवस्थापक आणि मुख्य नियोजन अधिकारी यांचा समावेश होता. या तपासणीदरम्यान नाशिक विभागीय कार्यालयातील विविध विभागांमधे आणि डेपोमध्ये कमालीचा ढिसाळ कारभार आणि कामातील हलगर्जीपणा उघडकीस आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उत्पन्न बुडवणाऱ्या आणि कामात कसूर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मंत्र्यांच्या आदेशानंतर ही मोठी कारवाई झाली. निलंबित करण्यात आलेल्या ११ अधिकाऱ्यांमध्ये क्लास वन (वर्ग-१) अधिकारी ३, क्लास टू (वर्ग-२) अधिकारी ८, (यात दोन डेपो मॅनेजर म्हणजेच आगार व्यवस्थापकांचाही समावेश आहे). वरिष्ठ पातळीवरून या ११ अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, जर संबंधित अधिकाऱ्यांनी ही निलंबनाची ऑर्डर स्वीकारण्यास नकार दिला किंवा टाळाटाळ केली, तर त्यांना ही नोटीस थेट त्यांच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठवण्यात येणार आहे.

---------

## ठाणेदारासह ९ पोलिसांना जन्मठेप

हे खळबळजनक प्रकरण सन २०११ मधील आहे. रिसोड पोलिसांनी एका गुन्ह्याच्या तपासासाठी संशयावरून बेग्या पवार नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले होते. पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळे आणि छळामुळेच बेग्या पवार याचा कोठडीत संशयास्पद मृत्यू झाल्याचा आरोप त्यावेळी त्याच्या नातेवाईकांनी केला होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपवण्यात आला होता. सीआयडीचे उपअधिक्षक अन्वर शेख, उपअधिक्षक चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला. या तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात सादर केलेले परिस्थितीजन्य पुरावे, वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदार अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सन्माननीय जे . पी. झपाटे यांनी या खटल्यातील तत्कालीन ठाणेदार माधव माणिकराव धांडे, पोलीस कर्मचारी मदन केशव पवार, शिवाजी नामदेव खिल्लारी, पंजाब माणिकराव पाटकर, रमेश सीताराम पवार, प्रकाश सीताराम ताराम, नागोराव भगवानराव खंडके, अशोक निवृत्ती वैद्य आणि वसंत कनीराम जाधव या नऊही आरोपींना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या अत्यंत संवेदनशील खटल्यात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीराम नारायणराव काळू यांनी बाजू मांडली. बेग्या पवार हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नव्हता, त्यामुळे कोणताही गुन्हा सिद्ध नसताना कायदा हातामध्ये घेऊन कोठडीत त्याचा अमानुष छळ करण्याचा अधिकार पोलिसांना नाही, हा कायदेशीर मुद्दा त्यांनी न्यायालयात भक्कमपणे मांडला. न्यायालयाने सर्व आरोपींना भारतीय दंड संहितेच्या खून, कबुलनामा मिळवण्यासाठी अमानुष छळ करणे व गंभीर दुखापत करणे, समान उद्देशाने गुन्हा करणे आणि गुन्हेगारी कारस्थान रचणे यांसारख्या विविध गंभीर कलमांन्वये दोषी घोषित केले. या सर्व कलमांच्या आधारे न्यायालयाकडून हा अंतिम न्यायनिवाडा करण्यात आला. कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर असते, त्याच यंत्रणेतील तत्कालीन ठाणेदारासह ९ कर्मचाऱ्यांना एका नागरिकाच्या मृत्यूप्रकरणी थेट खुनाच्या आणि छळाच्या कलमांखाली जन्मठेपेसारखी ऐतिहासिक व कठोर शिक्षा सुनावण्यात आली आहे. माननीय न्यायालयाच्या या चपराक लगावणाऱ्या निर्णयामुळे पोलीस वर्तुळाला प्रचंड मोठा धक्का बसला असून, संपूर्ण कायदेशीर आणि सामाजिक क्षेत्रात या ऐतिहासिक निकालाची जोरदार चर्चा सुरू आहे.

---------------

## जातीवादी पोस्ट टाकून सामाजिक तेढ निर्माण

त्यामुळे संबंधित समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून समाजात तेढ निर्माण होण्याची आणि सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९९, ३५२ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे आणि त्यांच्या पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे करत आहेत. दरम्यान, बीड पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास न ठेवण्याचे तसेच कोणत्याही समाजाच्या भावना दुखावतील, सामाजिक तेढ निर्माण करतील किंवा सार्वजनिक शांततेस बाधा पोहोचवतील असे फोटो, व्हिडिओ, संदेश किंवा अन्य आक्षेपार्ह मजकूर तयार, प्रसारित अथवा फॉरवर्ड न करण्याचे आवाहन केले आहे. अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

------------

## राम मंदिर दान चोरी प्रकरण : आरोपीच्या

देवाण-घेवाणीचा माग काढण्यास मदत होऊ शकते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. एसआयटीने या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सर्व ८ आरोपींच्या घरांची एकाच वेळी झडती घेतली असून तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाणारे दस्तऐवज, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर साहित्य जप्त केले आहे. अशाच प्रकारच्या देणगी पेट्या इतरत्रही वापरल्या गेल्या होत्या का आणि या कथित कारस्थानात आणखी काही व्यक्ती सामील होत्या का, याचाही तपास अधिकारी करत आहेत. स्थानिक न्यायालयाने एसआयटीला तपास पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदत दिल्यानंतर लगेचच ही जप्ती करण्यात आली.

--------------

## महिला शेतकऱ्यांना 'शेतकरी'

संरक्षणापेक्षा सन्मान आणि समानतेची वागणूक मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. महिला अनेकदा स्वतःच्या हक्कांवर पाणी सोडतात. वारसाहक्काचा अधिकार असूनही अनेक बहिणी भावाच्या नावावर हिस्सा करून देतात. मात्र या विधेयकातून महिलांनी जमिनीची मालकी मागितलेली नसून, शेतात कष्ट करणारी व्यक्ती म्हणून 'शेतकरी' ही ओळख मागितली आहे. शासनाने ही भावना ओळखून विधेयक आणल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शेती संकटात असतानाही ग्रामीण महिला कुटुंब आणि शेतीचा आधार बनून उभी राहते. शेतकरी आत्महत्येनंतर संपूर्ण संसाराची जबाबदारीही तीच पेलते. त्यामुळे या विधेयकामुळे तिच्या धैर्याला आणि आत्मविश्वासाला अधिक बळ मिळेल, असे मुंडे म्हणाल्या. जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाई आणि ताराबाई यांसारख्या महिलांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी प्रत्येक घरात सक्षम स्त्री घडविण्याची गरज व्यक्त केली. सक्षम महिला हीच समाज आणि राज्याच्या प्रगतीची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. भाषणाच्या शेवटी त्यांनी महिलेच्या अविरत कष्टांचा गौरव करणाऱ्या ओळी सादर केल्या. ''दिवसरात्र राबणाऱ्या हातांना कधीच कसा आराम नाही, असा एकही दिवस नसेल ज्या दिवशी तिला काम नाही. घरातील प्रत्येक कामावर जणू तिच्या नावाचा शिक्का बसला आहे, सगळ्या कामाचा जणू तिने ठेकाच घेतला आहे. असे वागणे तिचे जणू व्यसनच जडले कामाचे आणि मोबदला काय हवा? चार फक्त शब्द प्रेमाचे. जगाच्या मंचावर स्त्रीसारखा कलाकार नाही आणि आजपर्यंत त्या स्त्रीसारखा कामगारही मी पाहिलेला नाही,'' असे म्हणत त्यांनी महिला शेतकऱ्यांच्या श्रमांना सलाम केला. आजवर महिला जणू बिनपगारी कामगाराप्रमाणे राबत होती. मात्र या विधेयकामुळे तिला 'शेतकरी' म्हणून सन्मानाची ओळख मिळणार आहे. पशुसंवर्धन विभागाने पशुपालनाला शेतीचा दर्जा दिल्याने महिला पशुपालकांनाही याचा मोठा लाभ होईल. या विधेयकामुळे ग्रामीण महाराष्ट्र अधिक समृद्ध, सक्षम आणि आत्मनिर्भर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६५५ दिनांक-२४/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती अरुण रंगनाथ पिराणे रा.अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | ज्योती अरुणराव पिराणे | मुलगी | २०/०३/१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६५४ दिनांक-२४/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती संदीप अरुण पिराणे रा.अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या आई च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | दिपाली संदीप पिराणे | मुलगी | ०९/०९/२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## थोडक्यात



### हरित क्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

बीड :- माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांची ११३ वी जयंती वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या ज माती विकास महामंडळाच्या बीड जिल्हा कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भुषण पवार, श्रीमती बांगर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक श्रीमती बोराडे, महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एस.नरवाडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्रासाठी अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरीय योजनेअंतर्गत नवीन सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पात्र गोशाळांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. शासन निर्णयामधील तरतुदींनुसार बीड जिल्ह्यातील केवळ केज तालुक्यातुन पात्र असणाऱ्या गोशाळांचे अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त डॉ. आर. डी. कदम यांनी दिली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश, लाभार्थी गोशाळेच्या निवडीच्या अटी व शर्ती, निवड प्रक्रिया तसेच अर्जाचा विहित नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची सविस्तर माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अधिकृत https://schemes.mahagosevaayog.org/revised/govardhan-govansh-application या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक आणि पात्र गोशाळांनी आपले अर्ज दि. १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



आष्टी पंचायत समितीच्या नूतन गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांचा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे (ज्येष्ठ पत्रकार),उत्तम बोडखे (ज्येष्ठ पत्रकार),संतोष सानप (अध्यक्ष, पत्रकार संघ),गणेश दळवी,भीमराव गुरव,शरद तळेकर,मनोज पोकळे यांच्यासह पत्रकार संघाचे इतर सदस्य उपस्थित होते.

# माजलगाव-वडवणी-धारूर मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांसाठी १५ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीची मागणी

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी माजलगाव-वडवणी-धारूर मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांमधील इमारतविरहित शाळा, मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या तसेच वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे आवश्यक असलेल्या अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी एकूण १५ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीची✻ तरतूद जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून करण्यात यावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर)यांनी आ. प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनानुसार, माजलगाव तालुक्यात २२६ जिल्हा परिषद शाळा असून, ३ इमारतविरहित शाळांसाठी ३ वर्गखोल्या, ९ शाळांमधील १२ मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे पुनर्बांधकाम तसेच ६ शाळांमध्ये ८ अतिरिक्त वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. एकूण १८ शाळांमधील २३ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ✻२ कोटी ७६ लाख रुपये आणि ३० वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी २२ लाख ५० हजार रुपये, असा मिळून ३ कोटी ९८ लाख ५० हजार रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.वडवणी तालुक्यात १०० जिल्हा परिषद शाळा असून, १४ शाळांमधील ३१ मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे पुनर्बांधकाम आणि ५ शाळांमध्ये ७ अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम आवश्यक आहे. यासाठी १९ शाळांमधील ३८ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ✻४ कोटी ५६ लाख रुपये तसेच ४२ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ६८ लाख रुपये, असा मिळून ६ कोटी २४ लाख रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

धारूर तालुक्यात १२९ जिल्हा परिषद शाळा असून, ९ इमारतविरहित शाळांसाठी ९ वर्गखोल्या, ८ शाळांमधील १६ मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे पुनर्बांधकाम तसेच ४ शाळांमध्ये १० अतिरिक्त वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. एकूण २१ शाळांमधील ३५ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ४ कोटी २० लाख रुपये आणि २९ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ३७ लाख ५० हजार रुपये, असा मिळून ५ कोटी ५७ लाख ५० हजार रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे डॉ. ढवळे यांनी नमूद केले आहे. यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून या सर्व कामांना प्राधान्याने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

### मतदारसंघनिहाय निधीची आवश्यकता

माजलगाव तालुका :✻ ३ कोटी ९८ लाख ५० हजार रुपये
वडवणी तालुका :✻ ६ कोटी २४ लाख रुपये
धारूर तालुका :✻ ५ कोटी ५७ लाख ५० हजार रुपये
एकूण आवश्यक निधी : १५ कोटी ८० लाख रुपये

**प्रमुख कामे :** इमारतविरहित शाळांसाठी नवीन वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे पुनर्बांधकाम ✻ वाढत्या विद्यार्थी संख्येनुसार अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम ✻ जीर्ण वर्गखोल्यांची दुरुस्तीआवश्यक

# कृषी दिनानिमित्त रोटरी माजलगाव सेंट्रलचे वृक्षारोपण

## हरित माजलगाव अंतर्गत शहरातील मुख्यरस्त्यावरील वृक्षारोपणाचा टप्पा पूर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल कडून एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. माजलगाव पत्रकार संघाच्या संकल्पनेतून व रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलच्या माध्यमातून शहरातुन जाणाऱ्या पालखी मार्गांवर मुख्यरस्त्याच्या मधोमध मागील दोन वर्षांपासून वृक्षारोपण करण्यात येत होते त्यातील उर्वरित ५०० मीटर चा धारूर रोड वरील मौलाना आझाद चौक परिसरात दि ०२ जुलै गुरुवार रोजी वृक्षारोपण करून हरित माजलगावचा हा मुख्य टप्पा पूर्ण कारण्यात आला.



माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ आणि रोटरी सेंट्रलचे पास्ट प्रेसिडेंट इंजि. गजेंद्र खोत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्याच हस्ते प्रत्येकी ११ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.शहरातील पालखी मार्ग मुख्य रस्त्यावर छ.संभाजी महाराज चौक ते छ.शिवाजी महाराज चौक पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते मौ.आझाद चौक असे नियोजन करण्यात आले होते.हरित माजलगाव नावाने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प तत्कालीन रोटरी अध्यक्ष पांडुरंग चांडक (कार्यकाळ २०२४-२५) आणि त्यानंतरचे अध्यक्ष रो.विनोद जाधव (कार्यकाळ २०२५-२६) यांच्या कार्यकाळात सुरू झाला होता.रोटरी क्लबच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या प्रकल्पाचा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा रोटरीचे नूतन अध्यक्ष प्रभाकर शेटे यांनी आपल्या पदभाराच्या पहिल्याच दिवशी यशस्वीरित्या पूर्ण केला.रोटरी क्लबने सामाजिक बांधिलकी या सर्व झाडांचे संगोपन व संरक्षण करत ही सर्व झाडे शतप्रतिशत जोपासली व प्रकल्पाचे सातत्य राखल्याबद्दल नागरिकांमधून कौतुक होत आहे.

या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ व इंजि.गजेंद्र खोत यांच्यासह रोटरी सेंट्रलचे पूर्वाध्यक्ष रो.विनोद जाधव, अण्णासाहेब तौर, परमेश्वर शिंदे, आनंद शिंदे,रोटरी सेंट्रलचे नूतन सचिव अंकुश राठोड, रो.सुनील भालेराव आदी मान्यवर व रोटरीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे माजलगाव शहराच्या मुख्य रस्त्याला आगामी काळात एक सुंदर आणि हरित रूप प्राप्त होणार असून,वृक्षारोपण केलेल्या झाडांचे योग्य संगोपन करण्याची जबाबदारीही रोटरी परिवाराकडून घेतली जाणार असल्याचे यावेळी रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष रो.प्रभाकर शेटे यांनी सांगितले.

## पान ६ वरुन...

### गेवराईत बनावट 'सिंधी'

१ जुलै २०२६ रोजी गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गोपनीय बातमी मिळाली की, संजय नगर येथील एका घरात बनावट सिंधी विक्रीचा धंदा सुरू आहे. या माहितीवरून पोलिसांनी २ जुलै रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास सदर घरावर अचानक छापा टाकला. छापा टाकल्यानंतर घरातील हनुमान शंकरराव माकडे (वय ५७) हा ग्राहकांना बनावट सिंधी विकताना रंगेहाथ मिळून आला. त्याच्याकडून सिंधी तयार करण्यासाठी वापरले जाणारे घातक केमिकल्स, साहित्य, २०५ लिटर बनावट सिंधी आणि ग्राहकांच्या मोटारसायकल असा एकूण ४,७१,३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही सिंधी केमिकल्सच्या मिश्रणातून बनवली जात असल्याने ती मानवी शरीरास अत्यंत अपायकारक असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे गेवराई येथे आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७४ आणि महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या (म.दा.का.) विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्य आरोपी हनुमान माकडे याला अटक करण्यात आली असून, पुढील तपासासाठी त्याला न्यायालयासमोर हजर करून पोलीस कोठडी घेण्यात येणार आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि. समाधान दौड करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. किशोर पवार, सपोनि. अतुलकुमार लांडगे, पोउपनि. रामराव खोत आणि त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी केली आहे.

### हरवलेले २० मोबाईल

वाटून पोलीस दलाचे आभार मानले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके व गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. गेवराई पोलिसांच्या या कामगिरीबद्दल सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

### अवैध वाळू वाहतूक करणारी

असून, यात एकूण ९ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोह/९५४ हंबर्डे करत आहेत.

ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यासह अतुलकुमार लांडगे, समाधान दौड आणि गेवराई पोलीस ठाण्यातील इतर कर्मचाऱ्यांच्या पथकाने सहभाग घेतला होता

### ऐन पावसाळ्यात महिलांचा

हे आमचे कर्तव्य आहे आणि त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी प्रतिक्रिया सरपंच शिवाजी बुरंगुले यांनी दिली. गावासाठी सुरळीत पाणी सुरू नाही झाले तर आम्ही महिला सह सात आठ दिवसांमध्ये रस्ता रोको आंदोलन पाण्यासाठी करणार आहोत असे सामाजिक कार्यकर्ते भरत गाडे यांनी माध्यमशी बोलताना आपले मत व्यक्त केले.

### ज्ञानराधा व तिरुमला प्रकरणातील

मालमत्ताही जप्त केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तपास यंत्रणांनी जप्त केलेल्या मालमत्तेची एमपीआयडी कायद्याअंतर्गत विक्री करण्यास आवश्यक मंजुरी मिळाल्यास हजारो ठेवीदारांना त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाची कमाई परत मिळू शकते. त्यामुळे गृह, सहकार, सीआयडी, ईडी, एमपीआयडी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने संयुक्त बैठक बोलावून या प्रकरणी ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनाला बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचा पाठिंबा लाभला आहे. आ. प्रकाशदादा सोळंके, आ. संदीप भैय्या क्षीरसागर, आ. नमिताताई मुंदडा आणि आ. विजयसिंह पंडित यांनी सहस्वाक्षरी करून ठेवीदारांच्या न्यायासाठी एकजूट दर्शविली. यावेळी आ. सुरेश धस यांनी ठेवीदारांच्या न्यायासाठीचा लढा शेवटपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. हजारो कुटुंबांच्या आयुष्यभराच्या कष्टाची कमाई त्यांना परत मिळावी, यासाठी सर्व लोकप्रतिनिधी एकदिलाने प्रयत्नशील असून, शासनानेही याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### आष्टी ग्रामीण रुग्णालयातील

ज्येष्ठ नागरिक आणि आपत्कालीन रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुरक्षा व्यवस्थेवरही याचा विपरीत परिणाम होत आहे.

**प्रशासनाचे मौन संशय वाढवणारे**

लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्यानंतरही हाय मॅक्स दिवे सुरू होत नसतील, तर यासाठी जबाबदार अधिकारी, संबंधित विभाग आणि कंत्राटदार यांच्यावर कारवाई होणार का? की हा प्रकारही इतर अनेक अपूर्ण सरकारी कामांप्रमाणे फाईलपुरताच मर्यादित राहणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

**जनतेची मागणी**

हायमास्ट दिवे तात्काळ सुरू करावेत, कामाची व खर्चाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, रुग्णालय परिसरात सुरक्षित प्रकाशव्यवस्था त्वरित उपलब्ध करून द्यावी.

# मान्यवरांच्या उपस्थितीत शकुंतला धस यांचा सेवापूर्ती सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद सेवेतील आदर्श शिक्षिका शंकुतला शिवाजीराव धस (जाधवर) हया नियतवयोमानाने ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्ती वेळी त्या जि.प.शाळा वाघुलेवस्ती केंद्र पिंपळवाडी ता.जि.बीड येथे कार्यरत होत्या. करीता त्यांच्या सेवागौरव सोहळयाचे आयोजन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ व केंद्रीय शाळा पिंपळवाडीच्या वतीने करण्यात आले होते.



सेवागौरव सोहळयाचे अध्यक्ष कास्ट्राईबचे राज्य अध्यक्ष प्रकाशराव अहिरे हे होते तर प्रमुख अतिथी जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा माजी गटशिक्षणाधिकारी मा.तुकाराम जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी सिध्देश्वर माटे, राजेंद्र खेडकर, समग्र शिक्षा अभियानचे कार्यक्रम अधिकारी तथा उपसंपादक नारायणराव नागरे, पाटोदा शिक्षक पतसंस्था सचिव दिलीप खाडे, लोकतंत्र दैनिकाचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, कास्ट्राईब राज्य अध्यक्ष अनिल जाधवर, राज्य महासचिव सुभाष जगताप, केंद्रप्रमुख आणेराव, केंद्रीय मुख्याध्यापक रमेश गाडे हे होते.

संघटनेच्या वतीने संघटनेचे पदाधिकारी प्रकाश अहिरे, सुभाष जगताप, द.ल.वारे, भाऊसाहेब हंगे, संजय दराडे, हकीम मनियार, सोमनाथ तांदळे, शेख जलील, राहुल सुपेकर, स्वामी ढोकणे, सुर्यकांत शिंदे, रविंद्र सुतार, अर्जुन बारगजे यांनी शंकुतला धस यांचा सहकुटुंब सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख अतिथींनी धस यांच्या सेवेविषयी गौरवोध्दगार काढताना सांगितले की, शकुंतला धस हया विद्यार्थी प्रिय, शिस्तप्रिय व आदर्श शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. आपल्या सेवा काळात विद्यार्थ्यांवर ज्ञानबीज रोपन केले, सुसंस्कार केले. त्यांचे अनेक विद्यार्थी विविध पदावर शासकीय सेवेत अधिकारी व कर्मचारी पदावर कार्यरत आहेत.

अतिथींच्या वतीने सत्कार छंदराव तांबडे, सदानंद धस, मोतीलाल गोपाळघरे, बाबूराव तांदळे, बाळासाहेब जाधवर, संजय दराडे, विजय धस, भगिरथ तांदळे, चंद्रकांत धस, ऋषिकेश जाधवर यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. शकुंतला धस हया कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर यांच्या पत्नी आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब हंगे यांनी केले तर आभार जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ तांदळे यांनी मानले.

# पत्नीच्या मृत्यू प्रकरणात पतीला ५ वर्षांची सक्तमजुरी

तलवाडा । प्रतिनिधी

पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका खटल्यात अतिरिक्त सत्र न्यायालय-२, बीड यांनी महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपी सुरेश उर्फ चित्तेश्वर गुलाब राठोड याला त्याच्या प त्नीच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवले आहे.

घटनेची तारीख: १९ मार्च २०२३. ठिकाण: मौजे भेंडटकळी तांडा, ता. गेवराई, जि. बीड. कौटुंबिक वादातून आरोपीने आपली पत्नी, सविता सुरेश उर्फ चित्तेश्वर राठोड हिच्या डोक्यावर मोठ्या दगडाने प्रहार करून तिची हत्या केली होती. २० मार्च २०२३ रोजी तलवाडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३०२, ४९८-अ, ३२३, ५०६ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने आरोपी सुरेश राठोड याला भारतीय दंड संहिता कलम ३०४ (भाग-२) अंतर्गत दोषी ठरवले. आरोपीला पाच वर्षे सक्तमजुरी आणि १०,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. दंड न भरल्यास अतिरिक्त एक वर्षाच्या साध्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. प्रकरणातील इतर आरोपींची गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. हा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर श्रीराम वाघमोडे यांनी अत्यंत शास्त्रशुद्ध आणि वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे केला. शवविच्छेदन अहवाल, घटनास्थळावरून जप्त केलेला रक्तरंजित दगड, रक्तमिश्रित माती आणि रासायनिक विश्लेषण (सी.ए.) अहवाल यांचा वापर करून दोषारोपपत्र भक्कम करण्यात आले. सरकारी अभियोक्ता बी. एस. राख यांनी न्यायालयात प्रभावी युक्तिवाद केला. बीड पोलिसांच्या या निकालाने गंभीर गुन्ह्यांतील दोषसिद्धी मिळविण्याच्या त्यांच्या कटिबद्धतेचे प्रदर्शन केले आहे.

# गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांचा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे नवीन गटविकास अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्याबद्दल प्रयाग ढमाळ यांचा आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला.आष्टी तालुक्याच्या शाश्वत विकासासाठी आणि शासकीय योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन अधिकारी आणि प्रसारमाध्यमे यांनी समन्वयाने काम करावे प्रशासन आणि पत्रकार यांचा सतत समन्वय असला पाहिजे या उद्देशातून

उपस्थित ज्येष्ठ पत्रकारांनी प्रयाग ढमाळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि लोकहितैषी निर्णयांना प्राधान्य देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.या निमित्ताने तालुक्यातील पत्रकार क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे (ज्येष्ठ पत्रकार),

उत्तम बोडखे (ज्येष्ठ पत्रकार),

संतोष सानप (अध्यक्ष,पत्रकार संघ),गणेश दळवी,

भीमराव गुरव,शरद तळेकर,मनोज पोकळे यांच्यासह पत्रकार संघाचे इतर सदस्य आणि पंचायत समितीचे कर्मचारी उपस्थित होते.नूतन गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांनी पत्रकार संघाचे आभार मानत, तालुक्याच्या विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याचे आश्वासन दिले.

# धोक्याच्या छायेतून सुरक्षित भविष्याकडे;

## कपिलधारवाडी पुनर्वसनासाठी १८ कोटींचा दिलासा

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टी आणि भूस्खलनाच्या सततच्या धोक्यामुळे अनेक वर्षांपासून असुरक्षित जीवन जगणाऱ्या कपिलधारवाडी येथील ग्रामस्थांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. गावाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी तब्बल १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या निर्णयामागे आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

कपिलधारवाडी परिसरात अतिवृष्टीमुळे दरवर्षी भूस्खलनाचा धोका निर्माण होत असल्याने ग्रामस्थांच्या जीवित आणि मालमत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. अनेक वर्षांपासून या गावाच्या पुनर्वसनाचा विषय शासनदरबारी प्रलंबित होता. गावकऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांची दखल घेत आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी हा प्रश्न सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिला. विविध स्तरांवर पाठपुरावा करत पुनर्वसनाची गरज अधोरेखित केली. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळत पुनर्वसन विभागाकडून गावाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्णयामुळे गावातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याच्या नव्या आशा निर्माण झाल्या आहेत.

### लोकप्रतिनिधीच्या पाठपुराव्याला यश

**कपिलधारवाडी पुनर्वसनाचा प्रश्न केवळ विकासाचा नव्हे, तर ग्रामस्थांच्या जीवित सुरक्षिततेचा होता. शासनाने १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याने आता सुरक्षित निवास, मूलभूत सुविधा आणि भविष्यातील आपत्तीचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. मात्र, निधी मंजुरीनंतर प्रत्यक्ष पुनर्वसनाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे आणि प्रत्येक बाधित कुटुंबाला न्याय मिळणे, हेच आता ग्रामस्थांच्या अपेक्षेचे केंद्रबिंदू ठरणार आहे.**

निर्णयाबद्दल कपिलधारवाडी ग्रामस्थांनी आमदार विजयसिंह राजे पंडित यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच मंजूर झालेला निधी लवकरात लवकर खर्च करून पुनर्वसनाची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी आणि प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व सर्व सोयीसुविधांनी युक्त निवास उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली.

**ठळक वैशिष्ट्ये**

९ कपिलधारवाडीच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नाला मिळाला मार्ग

आमदार विजयसिंह राजे पंडित यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

भूस्खलनाच्या धोक्यातून ग्रामस्थांना सुरक्षित जीवनाची आशा

पुनर्वसनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची ग्रामस्थांची मागणी

# दुग्धव्यवसाय तोट्यात; पशुखाद्याच्या दरात वाढ

## पशुसंवर्धनमंत्र्यांचा मोठा खुलासा

मुंबई / प्रतिनिधी

राज्यात गेल्या वर्षभरात पशुखाद्याच्या दरात ३५ ते ४० टक्के वाढ झाल्याचे तसेच त्या तुलनेत दूध खरेदी दर स्थिर राहिल्याने दुग्धव्यवसाय तोट्यात आल्याचा प्रश्न जालनाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत उपस्थित केला. यावर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी खुलासा केला. पशुखाद्याच्या दरात वाढ झाल्याची माहिती खरी नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

वाढत्या तापमानामुळे आणि चाराटंचाईमुळे दूध उत्पादनात घट होत असल्यामुळे जनावरांचे पालनपोषण करणे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अवघड झाले आहे. पशुखाद्य दर नियंत्रण, चारा उपलब्धता वाढविणे व दूध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे, असाही प्रश्न खोतकर खोतकर यांनी केला. त्यावर



दिलेल्या लेखी उत्तरात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे की राज्यातील मागील ३ वर्षात चारा उत्पादनात तसेच दूध उत्पादनात घट झालेली नाही. पशुखाद्याचे दर हे त्यात असणाऱ्या घटकाचे प्रमाण व आवश्यक कच्च्या मालाचे किंमतीवर अवलंबून असतात. तसेच मागणी व पुरवठ्यावर अवलंबून आहेत. चारा उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेंतर्गत चारा बियाणे वाटप, हायड्रोफोनिक तंत्राद्वारे चारा उत्पादन, मिनी टीएमआर उपकरण व मुरघास सयंत्र, कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

विकसित भारत रोजगार आणि आविजिका मिशन (ग्रामीण) व्हीबी- जी राम जी २०२५ अंतर्गत जनावरांना सकस दर्जेदार व पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध व्हावा यासाठी वैरण विकासाच्या दृष्टिने रोजगार हमी योजना विभागाशी संसाधन अभिसरण करण्यात येत आहे. पशुधनास चांगल्या प्रतीचे पशुखाद्य उपलब्ध व्हावे यासाठी पशुखाद्याच्या पॅकिंगवर पशुखाद्यात समाविष्ट असलेले अन्नघटक व त्याचे प्रमाण नोंदविण्याचे बंधनकारक केले असल्याचे त्यांनी उत्तरात नमूद केले आहे.

## माती न करता केळीला खते टाकणे चुकिचेच



अनेक शेतकरी केळी लागवड करत आहेत. बाजारभाव चांगला, मागणी मोठी पण त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूकही मोठीच. त्यातच सर्वाधिक खर्च होतो तो खते टाकण्यात. पण एक गोष्ट बऱ्याचदा दुर्लक्षित होते ती म्हणजे माती परीक्षण. ''अंधारात दिवा न घेता चालणं म्हणजे धोका तसंच माती न तपासता खते घालणं म्हणजे पार चुकिचे आहे.

केळीला खरेच अधिक खते लागतात का?: केळी ही अन्नद्रव्यांची मोठ्या प्रमाणात मागणी करणारी पिकं आहे. पण अधिक म्हणजे काय? किती? कोणती खते? केव्हा? हे सर्व तुमच्या मातीच्या स्थितीवर अवलंबून आहे. जर मातीमध्ये आधीपासूनच नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, किंवा काही सूक्ष्म अन्नद्रव्यं पुरेशा प्रमाणात असतील, तर ते पुन्हा घालणं म्हणजे उगाच खर्च आहे.

माती परीक्षणामुळे काय कळतं? : मातीतील (सामू), (विद्युत वाहकता) नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश यांचं प्रमाण. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण. मातीची पोत आणि क्षारता.

अंधपणे खते टाकल्याचे परिणाम : खर्चात अनावश्यक वाढ, मातीचा पोत बिघडतो, झाडांची वाढ मंदावते, उत्पादन घटते, शेवटी शेतकऱ्याच्या नफ्यावर परिणाम.माती परीक्षणाचे फायदे : खतांचा अचूक डोस, उत्पादनात वाढ, माती आरोग्य टिकवणं, खर्चावर नियंत्रण, दीर्घकाळ टिकणारी शाश्वत शेती.

यामुळे केळी लागवडीपूर्वी माती तपासणी करून, अन्नद्रव्यांच्या गरजेनुसार खते द्या.

## जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्व. वसंतराव नाईक याच्या जयती निमित्त कृषीदिन साजरा

०१ जुलै २०२६ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे कृषी विभाग.जिल्हा परिषद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,बीड व पंचायत समिती.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिन साजरा करण्यात आला. मा.श्री.जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांच्या अध्यक्षतेखाली सदरील कार्यक्रम पार पडला. यावेळी मा.श्री.विलास जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प,बीड,मा.श्री.उदय देवळानकर,सल्लागार सचिव,राज्य कृषी मूल्य आयोग, मा.श्री.सुभाष साळवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,बीड श्री.साहिल सय्यद,कृषी विकास अधिकारी,बीड श्री.ओंकार बीडकर,का.अ.जलजिवन मिशन,बीड श्री.सुशीम शेटे सेवा निवृत विस्तार अधिकारी जि.प.बीड श्री. दत्तात्रय क्षिरसागर सहायक संचालक,इतर मागास बहूजन कल्याण,बीड श्री. दादाराव जाधवर,कृषी उपसंचालक,बीड, श्री. गर्जे उद्धव उप विभागीय कृषी अधिकारी,बीड,श्री. शिवराम घोडके,सदस्य कार्यकारी परिषद,पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला व डॉ. हनुमान गरुड,श्री. दत्ता जाधव कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी ,कृषी विभागातील इतर अधिकारी/कर्मचारी व जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व.वसंतराव नाईक यांच्या



प्रतिमेस मान्यवरच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून पूजनाने करण्यात आली. नंतर खरीप व रब्बी हंगाम २०२४-२५ पिक स्पर्धा मध्ये पुरस्कार विजेते शेतकरी यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्ती पत्र,फळाचे रोप व कृषी दर्शनी देवून सन्मान करण्यात आला.तसेच पात्र लाभार्थ्यांना मान्यवरच्या हस्ते प्रमाणित बियाणे वाटप करण्यात स्व.वसंतराव नाईक यांच्या जीवन चरित्र बद्दल श्री. सुशीम शेटे,सेवा निवृत विस्तार अधिकारी,बीड यांनी सविस्तर माहिती दिली तर श्री.उदय देवळानकर,कृषी तज्ञ यांनी हरित क्रांती साठी स्व. वसंतराव नाईक यांच्या योगदान व अल निनो सारख्या परिस्थिति मध्ये कोणकोणती पिके घ्यावी व शेतकऱ्याने शेतीवर आधारित छोटे उद्योग निर्माण करून

उद्योजक होणे आवश्यक असल्याचे मत मांडले. माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प,बीड श्री. जितीन रहमान यांनी शेतकऱ्यासाठी प्रभावी काम करावयाचे असेल तर स्थानिक परिस्थिति व भाषा अवगत असणे, शेतकऱ्याची आर्थिक स्थिति माहिती असणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धेमध्ये पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याने प्रगत तंत्रज्ञानाच्या माहितीच्या आधारे यश संपादन केले आहे, त्या माहितीला केंद्र बिंदु मानुन इतर शेतकऱ्यानी पुढे वाटचाल करणे आवश्यक आहे असे मत मांडले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. सुभाष साळवे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,बीड यांनी केले,सुत्रसंचालन श्री.सहदेव पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्री.साहिल सय्यद,कृषी विकास अधिकारी,बीड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. पुरुषोत्तम कात्रजकर जिल्हा कृषी अधिकारी, श्री.गरंडे एस.डी.मोहीम अधिकारी, बीड, श्री.अनिरुध सानप गट विकास अधिकारी पंचायत समिती,बीड,श्री. अशोक साळी,तालुका कृषी अधिकारी,बीड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात शेतकरी,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## तुरीबरोबर घ्या आंतरपीक; जाणून घ्या मुख्य कारण

अवर्षण प्रवण भागातील पावसाचे प्रमाण पाहिल्यास कोरडवाहू पिकासाठी वर्षाला एकच पीक घेण्याची पद्धत शेतकऱ्यात प्रचलित आहे.पाऊसमान खरीपात किवा रब्बीत योग्य असल्यास पिके हातात मिळतात.अन्यथा खरीप तरी जाते किंवा रब्बी तरी जाते. पाऊसमान योग्य नसल्यास दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागते.गेल्या दशकापासून हवामानात झालेला बदल, गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, टंचाई इत्यादीला बळीराजा सामोरे जात आहे,अशा परिस्थितीत सुधारित परंतु प्रभावी असे तंत्रज्ञान म्हणजे आंतरपीक पद्धत.आंतरपीक पद्धतीमुळे दुष्काळाची झळ कमी बसते आणि पाऊसमान योग्य असल्यास हेक्टरी अधिक धान्योत्पादन होते. खरीप हंगामात आंतरपीक पद्धती योग्य आहे.अवर्षणप्रवण भागातील कोरडवाहू क्षेत्रात बाजरी,सूर्यफुल ,तूर,उडीद मूग,हुलगा, मटकी इत्यादी महत्वाची खरीप पिके आहेत.अति उथळ जमिनीवर सुधारित गवताबरोबर हुलगा किंवा मटकी आणि उथळ जमिनीत बाजरी किंवा सुर्यफूल + तूर (२:१) ओळी या प्रमाणात आंतरपीक पद्धतीची शिफारस केली आहे.

कमी पाण्यात,कमी कालावधीत,कमी उत्पादन खर्चात तूर किंवा तूर + आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास शेतकरयांना फायदेशीर तर ठरेलच,त्याच बरोबरीने जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.पट्टा पद्धतीत तूर पेरणी केल्यानंतर जोड ओळीतील प्रत्येक तुरीच्या झाडास भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा मिळते,त्यामुळे फुलांचे शेगांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता वाढते.त्यामुळे उत्पादकतेत वाढ होते.पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरयांनी फेरपालट म्हणून तुरीच्या पिकाचा विचार केला पाहिजे.तुरीच्या पिकातून जमिनीवर पडणारा पालापाचोळा यापासून मिळणारया सेंद्रिय खतामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. एकरी अर्धा टन सेंद्रिय खत जमिनीस मिळते.तूर पिकामुळे पुढील पिकास एकरी ५० ते ८० किलो नत्र मिळते.



तुरीच्या वाढीच्या काळात जमिनीवर पालापाचोळयाच जे आच्छादन तयार होते,त्यामुळे जमिनीवरील ओल्यावर येणाऱ्या लव्हाळा व इतर तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते.पारंपारिक पद्धतीत तुरीच्या दोन ओळीतील अंतर दोन ते अडीच फुट ठेवतात.मात्र त्यामुळे तुरीवरील फवारणी करण्यात अनेक अडचणी येतात.तुरीच्या दोन ओळीत ९० से.मी अंतर आणि १८० से. मी.पट्टा परत पुन्हा ९० से.मी. अंतराच्या तुरीच्या जोडओळी या प्रयोगातून तुरीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच आंतरपिकांचा लाभ मिळवता येईल.तुरीच्या दोन ओळीत जी संरी पडली जाईल,तिच्यात पावसाचे पाणी मुरेल.या ओलाव्याचा तुरीला लाभ होईल.तुरीची मुळे जमिनीत खोलवर जातात,त्यामुळे जमीन भुसभुशीत पोकळ होते.कोरडवाहू शेती संशोधन केंद्र,सोलापूर येथे अनेक वर्षाच्या प्रयोगातून फायदेशीर असणारी बाजरी+ तूर (२:१) किंवा सुर्यफुल+ तूर (२:१) ह्या आंतरपीक पद्धतीमुळे अनुक्रमे ७० आणि ८४ टक्के उत्पादनात वाढ झाली आहे.

भिन्न कालावधी,भिन्न मूळ रचना असणारी पिके निवडली तर ती एकमेकांबरोबर अनिष्ट स्पर्धा न्? करता पूरक ठरतात. उदा. बाजरी + तूर (२:१) किंवा सूर्यफुल + तूर ( २:१ ) आंतरपिकातील बाजरी व सूर्यफुलाचा कालावधी ८० ते ९० दिवसाचा असतो.तर तुरीच्या वाणानुसार १२५ ते १६० दिवसांचा राहील. बाजरी अगर सूर्यफुल काढल्यानंतर राहिलेल्या कालावधीतील पाऊस,सूर्यप्रकाश,जमिनीतील ओलावा,अन्नद्रव्ये व जागा ह्याचा तुरीच्या वाढीस उपयोग होतो.बाजरी/ सूर्यफुलाची मुळे तंतुमय असल्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील ओलावा,अन्नद्रव्याचे चे शोषण होते. तर तुरीस सोटमूळ असल्यामुळे जमिनीतील खालच्या थरातील अन्नद्रव्ये व ओलाव्याचे शोषण होते.त्यामुळे ती एकमेकास पूरक ठरतात. तूर हे कडधान्य पीक असल्यामुळे त्याच्या मुळावरील गाठीत रायझोबियम नावाचे सुक्ष्म जीवाणू असतात ते हवेतील नत्र शोषून जमिनीत गाडतात आणि पुढील पिकास उपलब्ध करून देतात, त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढते.तूर तयार होते वेळी निम्मा पाला जमिनीवर पडतो.त्यामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून पोत सुधारतो.अशा दिव्दल धान्य पिकांचा समावेश आंतरपीक पद्धतीत केल्यास जमिनीची सुपिकता व पोत सुधारून टिकून राहते.आंतरपिकांसाठी निवडावयाच्या तुरीच्या जाती या मध्यम मुदतीच्या असाव्यात.अलीकडच्या काळात तूर + सोयाबीन (१:३ किंवा १:४) पद्धतीने पेरल्यास दोन्ही पिकांचे चांगले उत्पादन येत असल्याचे दिसून आले आहे.सोयाबीनच्या ओळीमध्ये ३० से.मी. तर दोन रोपांमध्ये १० से.मी. अंतर ठेवावे आणि सोयाबीनच्या तीन ओळीनंतर एक ओळ तुरीची पेरावी.तुरीच्या दोन ओळीतील अंतर १२० से.मी. येते.तुरीच्या दोन रोपातील अंतर २० से.मी. ठेवावे.सोयाबीन बियाणे ६० ते ६५ किलो प्रती हेक्टर तर ५ किलो तुरीचे बियाणे प्रती हेक्टेरला पुरेसे होते.आंतरपीक पद्धतीमुळे कोणत्याही पिकाचे क्षेत्र कमी न होता नवीन पिकाखाली अधिक क्षेत्र आणता येते आणि उत्पादनात स्थिरता येते. या पद्धतीत खतांचा सुयोग्य आणि पुरेपूर वापर होतो. आंतरपीक पद्धतीत दोन पिके असली तरी मुख्य एका पिकासाठीच देण्याची शिफारस असल्याने दिलेले खत दोन्ही पिकास उपयुक्त ठरते.बाजरी + तूर अगर सूर्यफुल + तूर या आंतरपीक पद्धतीत बाजरी/सूर्यफुल काढल्यानंतर मशागत करणे महत्वाचे असते .कारण मुख्य पीक निघाल्यानंतर,दुसऱ्या पिकांकरिता ओळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे.त्याकरिता पीक काढल्याबरोबर कुळव चालवून तण व धसकटे उपटून काढून तेथेच वाळू द्यावीत.

आंतरपीक पद्धतीचे फायदे : वर्षात दोन/ तीन पिके घेता येतात. जमिनीस कमी मशागत लागते. पावसाचा व सूर्यप्रकाश कालावधीचा उपयोग करता येतो. जमिनीतील ओलावा,अन्नद्रव्ये व जागा यांचा पुरेपूर उपयोग होतो. जमिनीची सुपिकता व पोट सुधारतो. हेक्टरी अधिक उत्पादन होते. विपरीत व प्रतिकूल हंगामात एखादे तरी पीक हाती येते. एकूण मशागत खर्च कमी हेक्टरी नफ्याचे प्रमाण अधिक आंतरपीक पद्धतीमुळे अनेक प्रकारचे फायदे मिळून, शेतकरी बंधूना जास्त नफा मिळण्यास मदत होते आणि ते ही कमी जागेतून व कमी वेळात.शेतकरीबंधूनी या आंतरपीक पद्धतीचा अवलंब आपल्या शेतावर अवश्य करावा.




### महत्वाच्या घटना

१६०८ : सॅम्यूअल बी. चॅम्पलेन यांनी कॅनडातील क्वेबेक शहराची स्थापना केली.
१६६१ : पोर्तुगीजांनी इंग्लंडचे राजा चार्ल्स द्वितीय यांना मुंबई व तंजौर बेट भेट दिले.
१७६० : मराठा सेनेने दिल्लीवर ताबा मिळविला.
१८५० : इस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांनी भारतातुन आणलेला 'कोहिनूर' हिरा इंग्लंडच्या राणीच्या स्वाधीन केला.
१८५२ : महात्मा फुले यांनी दलित मुलांसाठी पहिली शाळा काढली.
१८५५ : भारतात कायदे शिक्षणाचा प्रारंभ झाला.
१८८४ : डाऊ जोन्स हा निर्देशांक सुरू झाला.
१८८६ : जर्मनीच्या कार्ल बेन्झ याने जगातील पहिली मोटारगाडी बनवली.
१८९० : आयडाहो हे अमेरिकेचे ४३ वे राज्य बनले.
१९०८ : इंग्रज सरकारने लोकमान्य टिळकांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली.
१९२८ : लंडनमध्ये प्रथमतः रंगीत दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे प्रक्षेपण झाले.
१९३८ : 'मॅलार्ड' हे वाफेचे इंजिन ताशी १२६ मैल (२०२ कि. मी.) वेगाने न्यू कॅसलहून लंडनला पोहोचले. वाफेच्या इंजिनाचा हा वेगाचा विक्रम अजूनही अबाधित आहे.
१९७२ : भारत आणि पाकिस्तान देशांत काश्मीर संबंधी नि:शस्त्र करार झाला.
१९९८ : 'ए मेरे वतन के लोगो ' या प्रसिद्ध गाण्याचे कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
२००० : विक्रांत या विमानवाहू युद्धनौकेचे मुंबईच्या समुद्रात ऑयस्टर रॉकजवळ सागरी संग्रहालयात रुपांतर करण्यास नौदल, राज्यसरकार, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि मच्छिमार प्रतिनिधींनी मान्यता दिली.
२००१ : सुधीर फडके यांना राज्य सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
२००६ : एक्स. पी. १४ हा लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळुन (साधारण चंद्राइतक्या अंतरावरुन) गेला.
२०१७ : अचल कुमार ज्योती यांची भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्त पदी निवड करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८३ : इंग्लिश कवी एडवर्ड यंग यांचे जन्म.
१८३८ : मामा परमानंद पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (मृत्यू: १३ सप्टेंबर १८९३)
१८८६ : रामचंद्र दत्तात्रय तथा 'गुरूदेव' रानडे आधुनिक विद्याविभूषित तत्त्वज्ञ व संत, फर्ग्युसन व विलींग्डन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जून १९५७)
१९०९ : बॅरिस्टर व्ही. एम. तथा 'भाऊसाहेब' तारकुंडे कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ (मृत्यू: २२ मार्च २००४)
१९१२ : श्रीपाद गोविंद नेवरेकर मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय गायक व नट (मृत्यू: १६ जून १९७७)
१९१४ : दत्तात्रय गणेश गोडसे इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार (मृत्यू: ५ जानेवारी १९९२)
१९१८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते व्ही. रंगारा राव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जुलै १९७४)
१९२४ : सेलप्पन रामनाथन सिंगापूरचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९२४ : तामीळवंशीय राजकारणी, सिंगापूरच्या प्रजासत्ताकाचे वे६ राष्ट्राध्यक्ष सेल्लप्पन रामनाथन यांचा जन्म.
१९२६ : सुनीता देशपांडे लेखिका व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ७ नोव्हेंबर २००९)
१९५१ : सर रिचर्ड हॅडली न्यूझीलंडचे क्रिकेटपटू
१९५२ : भारतीय गायक अमित कुमार यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन लेखक रोहिनटन मिस्त्री यांचा जन्म.
१९७१ : विकीलीक्स चे संस्थापक ज्युलियन असांज यांचा जन्म.
१९७६ : हेन्री ओलोंगा झिम्बाब्वेचे क्रिकेटपटू
१९७७ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन माराठी गायक, संगीत नाटक-अभिनेते श्रीपाद गोविंद नेवरेकर यांचा जन्मदिन.
१९८० : हरभजनसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८७ : युवसेना जिल्हाअधिकारी जळगाव माननीय प्रितेश ठाकूर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत नामदेव यांनी समाधी घेतली. (जन्म: २९ आक्टोबर १२७०)
१९३३ : अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचे निधन. (जम: १२ जुलै १८५२)
१९३५ : सिट्रोएन कंपनीचे संस्थापक आंद्रे सीट्रोएन यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १८७८)
१९६९ : ब्रायन जोन्स 'द रोलिंग स्टोन्स'चे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक (जन्म: २८ फेब्रुवारी १९४२)
१९९६ : कुलभूषण पंडित तथा 'राजकुमार' ऊर्फ 'जानी' जबरदस्त आवाजाने संवादफेक करून प्रेक्षकांना खूष करणारा हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: ८ आक्टोबर १९२६)
१९९९ : परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित गोरखा रायफल्सचे भारतीय सैन्य अधिकारी कॅप्टन मनोज कुमार पांडे यांचे निधन.
२०१५ : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी (३६वे) सरन्यायाधीश योगेश कुमार सभरवाल यांचे निधन.



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

शुक्रवार दि.३ जुलै २०२६ ५



# संत मुक्ताई पालखी सोहळ्याच्या पुर्वतयारीचा जिल्हाधिकारीकडून प्रत्यक्ष आढावा

जालना। प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळ्याच्या तसेच जिल्ह्यात प्रथमच आयोजित होत असलेल्या रिंगण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन विविध विभागांच्या पुर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी पालखी सोहळा व रिंगण सोहळा निर्विघ्न, सुरक्षित, शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.



पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश दिले. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, अखंडित वीज पुरवठा, आरोग्य सुविधा औषधीसाठा, तात्पुरती वैद्यकीय पथके, मोबाईल व सार्वजनिक स्वच्छतागृहे तसेच मुक्कामस्थळी आवश्यक सर्व मूलभूत सुविधा प्रत्यक्ष पाहणी करून उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, संवेदनशील ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवणे तसेच आवश्यकतेनुसार वाहतूक वळविण्याचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. त्याचबरोबर अग्निशमन, महसूल, सार्वजनिक बांधकाम, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, महावितरण, सार्वजनिक आरोग्य, पशुसंवर्धन, अन्न व औषध प्रशासन, परिवहन तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करून वारकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

पालखी मार्गावरील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, अन्नपदार्थांची तपासणी, सार्वजनिक आरोग्य विषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यावर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान विशेष भर दिला. जिल्ह्यात प्रथमच होत असलेल्या रिंगण सोहळ्याच्या अनुषंगाने जालना शहर महानगरपालिकेमार्फत स्वच्छता, आरोग्य सुविधा, मोबाईल टॉयलेट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज पुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, व्यासपीठ उभारणी तसेच इतर सर्व आवश्यक नागरी सुविधा दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच पोलीस प्रशासनाने वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, पार्किंग व्यवस्था, आवश्यकतेनुसार वाहतूक वळविणे आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी सक्षम नियोजन करण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले. सर्व यंत्रणांनी क्षेत्रीय स्तरावर नियमित पाहणी करून स्थानिक प्रशासनाशी सातत्याने समन्वय राखावा तसेच कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तात्काळ उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

## शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा डॉ. कृष्णकांत कनवारिया



जालना। प्रतिनिधी

शेती उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात बचत तसेच हवामान बदलाच्या आव्हानांवर प्रभावीपणे मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी केले.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद, जालना यांच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, कृषी विभागाचे गहिनीनाथ कापसे, यावेळी आपल्या मार्गदर्शनात डॉ. कनवारिया यांनी शेतकऱ्यांनी मृदा परीक्षण, सूक्ष्म सिंचन, सुधारित बियाणे, कृषी यांत्रिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान आणि हवामानाधारित शेती व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. जिल्हा परिषद शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून कृषी क्षेत्रात महिला शेतकऱ्यांचा सहभाग व सन्मान अधिक वाढला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर पिक स्पर्धेतील विजेते, नाविन्यपूर्ण शेती करणारे शेतकरी, चिया सीडमध्ये उल्लेखनीय उत्पादन घेणारे शेतकरी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतील यशस्वी लाभार्थी अशा विविध शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# १६६ शाळांमधील १८ हजार ७०४ विद्यार्थ्यांना गणवेश

## पुस्तकांचे वितरण, नवप्रवेशित विद्यार्थ्यांची कुठे बैलगाडीतून तर कुठे वाहनातून प्रवेश मिरवणूक

खामगाव। प्रतिनिधी

नवीन मित्र नवीन पुस्तके व नवीन शालेय गणवेश या तीन गोष्टीच्या आनंदाच्या मेळ्याची अनुभूती तालुक्यातील विद्यार्थ्यांना शाळा प्रवेशाच्या दिवशी ३० जून रोजी आली. नव्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे केवळ गुलाब पुष्प देऊन स्वागतच नव्हे तर त्यांची कुठे सजवलेल्या बैलगाडीतून कुठे उघड्या जीप मधून तर कुठे चार चाकी वाहनातून गावातून मंगल वाद्यासह मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थांतर्फे त्यांचे जागोजागी स्वागत करण्यात आले.



खामगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १६६ शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या एकूण १८ हजार ७०४ विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवेशोत्सवाच्या दिवशी विनामूल्य शालेय गणवेश पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना गोड पदार्थ देऊन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. शहरापासून जवळच असलेल्या टेंभुर्णा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे अप्पर विभागीय आयुक्त शालिनी कडू यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि गणवेशाचे वितरण करण्यात आले. या शाळेतील नवप्रवेशित विद्यार्थ्यांची गावातून सजवलेल्या बैलगाडीतून मंगल वाद्यासह प्रवेश मिरवणूक काढण्यात आली तर रामनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील समग्र शिक्षा अभियानाचे गटशिक्षणाधिकारी गजानन गायकवाड व शालेय व्यवस्थापन समिती यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले. शाळेच्या प्रवेशावेळी त्या विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल स्मृती जपण्यात आल्या. तालुक्यातील अन्य शाळांमधील प्रवेशोत्सव सोहळा आणि विद्यार्थ्यांना पाठचपुस्तकाचे व गणवेशाचे शालेय व्यवस्थापन समिती व मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले यावेळी पालक वर्ग व शिक्षक वृंद उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या दिवशी देण्यात आलेल्या शालेय गणवेशाच्या कापडाचा दर्जा त्याची शिलाई याची गुणवत्ता तपासणीसाठी तालुक्यातील केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी शाळांना भेटी देणार आहेत आणि त्याची तपासणी करणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी गजानन गायकवाड यांनी दिली. गणवेशाचे ४४ लाख ८८ हजार रुपयाचे वितरण सर्व शाळा व्यवस्थापन समितीने अधिकाराचा वापर करत रेडिमेड कापड दुकानातून गणवेश खरेदी केले. मुख्याध्यापकांनी समग्र शिक्षा अभियान कार्यालय खामगाव येथे बिले जमा केली आणि त्या बिलाची एकूण ४४ लाख ८८ हजार ९५० रुपये दुकानदाराच्या खात्यात जमा करण्यात आली. उर्वरित २० टक्के रक्कम ही शासनाकडून देण्यात येईल, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी गायकवाड यांनी दिली.

# मुलींच्या सुरक्षिततेसाठी तायक्कांदो प्रशिक्षण विवेकानंद शाळेचा उपक्रम

## आत्मसंरक्षणासोबत क्रीडा क्षेत्रात मुलींना सक्षम करण्याचा संकल्प

पाथर्डी । प्रतिनिधी

मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांना आत्मविश्वास, आत्मसंरक्षण आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या उद्देशाने येथील विवेकानंद विद्या मंदिर येथे अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान व विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी ते सातवीपर्यंतच्या मुलींसाठी तायक्कांदो प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विस्वस्थ कुणाल आव्हाड यांच्या संकल्पनेतून तायक्कांदो प्रशिक्षण अभियान सुरू करण्यात आले या उपक्रमामध्ये



तायक्कांदो प्रशिक्षक पायल आसलकर यांच्या प्रशिक्षणातून मुलींना प्रत्यक्ष आत्मसंरक्षणाची तंत्रे संकटसमयी योग्य निर्णय घेण्याची कला तसेच शिस्त धैर्य आणि मानसिक बळ विकसित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत प्रत्येक मुलीने आत्मसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करणे ही काळाची गरज असून या प्रशिक्षणाद्वारे मुलींना केवळ स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता मिळणार नाही तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तायक्कांदो स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधीही उपलब्ध होणार आहे या उपक्रमामध्ये नियमित सराव तांत्रिक प्रशिक्षण फिटनेस व्यक्तिमत्त्व विकास आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक शारीरिक तयारी यांचाही समावेश असेल त्यामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढून त्या प्रत्येक क्षेत्रात सक्षमपणे पुढे जाण्यास प्रवृत्त होतील तायक्कांदो प्रशिक्षण शुभारंभप्रसंगी विश्वस्त कुणाल आव्हाड तायक्कांदो प्रशिक्षक पायल आसलकर समन्वयक ज्ञानेश्वर गायके, क्रीडा शिक्षक प्रमोद हंडाळ गौरव दाणे तसेच विवेकानंद विद्या मंदिरचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

# माऊलींच्या पालखी रथाला हिंगोलीचा साज ;बैलजोडी आळंदीत सजणार

हिंगोली। प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी येथील पालखी रथाची बैलजोडी हिंगोलीच्या साजाने सजणार असून या बैलजोडीसाठी आवश्यक असलेला साज आळंदी येथे संस्थानकडे सूपुर्द करण्यात आला आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्यभरातून पालखी सोहळे विट्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे जातात. लाखो वारकरी आषाढी एकादशीला विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेऊन तृप्त होता. हरिनामाचा गजर करीत निघालेल्या पालखी सोहळा, दिंडी यामुळे संपूर्ण वातावरण धार्मिक होते. पालखी सोहळयातील वारकऱ्यांची मुक्कमाच्या ठिकाणी भोजनासह पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा केली जाते. या शिवाय पालखी मार्गावर ठिकठिकाणी चहा, पाणी, नाश्ता दिला जातो. दानशूरांकडून सुमारे एक महिनापेक्षा अधिक कालावधीसाठी वारकऱ्यांची सेवा केली जाते. दरम्यान, हिंगोली येथील भांड्याचे व्यापारी राहुल कानडे यांनी आळंदी येथून निघाणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचा रथ वाहून नेणाऱ्या बैलजोडीला साज देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी बैलजोडीच्या साजाचे संपूर्ण साहित्य तयार केले.

यामध्ये पितळी मोरक्या, पितळी कासरा घेण्यात आला असून रिसोड येथील देवराव रंजवे या कारागिराने हाताने कासरा तयार करून दिला आहे. त्यासाठी त्यांनी कुठल्याही प्रकारचा मोबदला घेतला नाही. सेवा म्हणून त्यांनी हाताने कासरा तयार केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुमारे ८ ते १० फुट लांबीचा कासरा तयार करण्यासाठी त्यांना सुमारे १० ते १५ दिवसांचा कालावधी लागला आहे. त्यासाठी लागणारे साहित्य राहुल कानडे यांनी उपलब्ध करून दिले. दरम्यान, बैलजोडीच्या साजाचे साहित्य नुकतेच आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांच्याकडे सुपूर्द केले. या निमित्त राहुल कानडे यांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

जाहीर प्रगटन

**मा. श्री. के. के. पाटील सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९२६/२०२६**

**ॲड. ए. ए. हसेगांवकर यांच्या मार्फत स्वाती वगैरे वि. निरंक**

ज्यापेक्षा निलेश सर्जेराव काळे, हे दिनांक ०१/०५/२०२६ रोजी मौजे, विवेकानंद मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

१.स्वाती भ्र. निलेश काळे, वय. ४३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. मारुती मंदिराजवळ संभाजी नगर, बालेपीर, बीड ता. जि. बीड २. श्रावणी पि. निलेश काळे, वय. १६ वर्षे, धंदा. शिक्षण, अज्ञान ३. तन्वी पि. निलेश काळे, वय. १३ वर्षे, धंदा, शिक्षण, अज्ञान अर्जदार क्र ०२ व ०३ ची अ.पा.क. आई अर्जदार क्र १ रा. वरील प्रमाणे ४. इंदुबाई सर्जेराव काळे, वय. ७६वर्षे, धंदा, घरकाम, रा. मारुती मंदिराजवळ संभाजी नगर, बालेपीर, बीड ता.जि. बीड

अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी आहे तर अर्जदार क्र ०२ व ३ या मयताच्या अज्ञान मुली आहेत अर्जदार क्र ०४ मयताची आई आहे. अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे निलेश सर्जेराव काळे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २८/०७/२०२६ ही आहे.

आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

# परमेश्वराला साधेपणा, निष्कलंकपणा असलेला भक्त प्रिय- किशोर महाराज

## एरंडोल येथील पायी दिंडीला ३२ वर्षे पूर्ण, कन्नड येथे वारकऱ्यांचा मुक्काम

कन्नड। प्रतिनिधी

अलीकडच्या काळात समाजात दिखाऊ आणि भपकेबाज भक्तीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. मात्र, अशा बाजारू स्वरूपाच्या भक्तीने परमेश्वर प्रसन्न होत नाही. देवाला निव्वळ साधेपणा, निष्कलंकपणा आणि मनातील खरेपणा असलेला भक्तच प्रिय असतो, असे प्रतिपादन कीर्तनकार किशोर महाराज कासोदेकर यांनी केले.



श्री राजे गोविंद आश्रम व गोसेवा संस्थान, एरंडोल (जळगाव) येथील पायी दिंडीला यंदा ३२ वर्षे पूर्ण झाली आहेत. या प्रीत्यर्थ कन्नड येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष कीर्तन सोहळ्यात ते बोलत होते. निरूपणासाठी किशोर महाराज कासोदेकर यांनी 'संपदा सोहळा ना आवडे देवा' हा अभंग घेतला होता. या वेळी कीर्तनातून आजच्या परिस्थितीवर रोखठोक भाष्य करताना ते म्हणाले, ''आजकाल भक्ती आणि कीर्तनाचे मार्केट सुरू झाले आहे. पण देवाला असल्या बाह्य श्रीमंतीचा किंवा भपक्याचा सोहळा कधीच आवडत नाही. संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत सावता माळी अशा अत्यंत साध्या आणि सरळ भक्तांच्या हाकेला धावून येतो. म्हणूनच एकचित्ताने आणि खऱ्या भावनेने केलेले नामसंकीर्तन थेट ईश्वरापर्यंत पोहोचते. साधे सरळ नामस्मरणही देवाला भावते.

या कीर्तन सोहळ्याला उत्तमराव गिरी, रामराव घुले, बाळासाहेब थोरात, अशोक महाराज मुंडवाडीकर, वाकडे महाराज कळंकीकर यांच्यासह शांतीनगर लिंगेश्वर महाराज भजनी मंडळाने उत्कृष्ट साथसंगत केली. यावेळी गोकुळ राठोड, खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष सुरेश डोळस, संदीप महाजन, विजय शिरसाठ, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विनोद पवार, राजू शेख कमिटी, राजेंद्र नेवगे, संतोष राजे जाधव, डॉ. सदाशिव पाटील, बाळू दाभाडे, रिजवान शेख, आकाश बोलधने, अश्विनी बोलधने, कस्तुरा राठोड, सुमन जाधव, शिवनंद गिरी, अनिता कवडे, जयश्री कवडे, ताराबाई जाधव, छबुबाई पवार यांच्यासह परिसरातील वारकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी उभारणार निवारा गृह या दिंडीचे कन्नड शहरात आगमन झाल्यानंतर कन्नड नगर परिषदेच्या वतीने नगराध्यक्षा फरीन बेगम व नगरसेवक अब्दुल जावेद यांनी पुष्पहार अर्पण करून वारकऱ्यांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी बोलताना नगरसेवक अब्दुल जावेद म्हणाले, ''खानदेशातून पंढरपूरकडे निघणारी ही अखंड पायी दिंडी दरवर्षी कन्नड येथे मुक्काम करते. अशा पवित्र वारकऱ्यांचे दर्शन घडल्याने आमचीही एक प्रकारे वारीच घडली आहे. भविष्यात नगर परिषदेच्या वतीने वारकऱ्यांच्या सोयीसाठी शहरात एक सुसज्ज निवारा गृह उभारण्यात येईल.

# जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेतील गैरकारभाराचा अहवाल सादर करा

## डीडीआर सुरेखा फुपाटे यांचे आदेश, एक सदस्यीय समिती स्थापन

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेतील गैरकारभाराची चौकशी करून सहा महिन्यात अहवाल सादर करण्याच आदेश जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांनी दिले आहेत. त्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. हिंगोली जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या विरोधात तक्रारींचा ओघ वाढला होता. या तक्रारीनंतर जिल्हा उपनिबंधक फुफाटे यांनी सुनावणी घेतली होती. या सुनावणी नंतर पतसंस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करून त्या ठिकाणी प्रशासक म्हणून सहाय्यक निबंधक अक्षय गुठ्ठे यांची नियुक्ती केली आहे. तर पतसंस्थेने संचालक मंडळ बरखास्तीवर आक्षेप घेऊन विभागीय निबंधकांकडे अपील केले होते. मात्र त्या ठिकाणीही अपील फेटाळून लावण्यात आले.





दरम्यान, त्यानंतर पतसंस्थेचे सचिव गंगाराम ढेंगळे तसेच चार कर्मचाऱ्यांसह इतरांनी पतसंस्थेच्या कारभाराबाबत तक्रारी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत असून शेअर्स व ठेव परत दिली जात नाही, नियमबाह्य कर्ज वाटप केले तसेच रोख रक्कम उचल केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. या तक्रारीवरून जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुफाटे यांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. यामध्ये चौकशी अधिकारी म्हणून रामेश्वर खोंड यांची नियुक्ती केली आहे. संस्थेचे उपविधीतील तरतुदीनुसार चौकशी करून सहा महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश उपनिबंधक फुपाटे यांनी दिले आहे. त्यामुळे आता पतसंस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी होणार असून या चौकशी मध्ये काय निष्पन्न होणार याकडे संस्थेच्या सभासदांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.०३ जुलै २०२६ | ६

# बीड शहराचा मुख्य रस्ता आता मोकळा

## अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे बीडकरांचा श्वास मोकळा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी वाहतूक शाखा आणि नगरपालिका प्रशासनाने हाती घेतलेल्या धडक अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे शहराचे मुख्य रस्ते आता खऱ्या अर्थाने मोकळे झाले आहेत. वाहतूक शाखेचे प्रमुख वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने शहराच्या मध्यवर्ती भागातील अनधिकृत बांधकामे आणि हातगाड्या हटवल्या असून, या मोहिमेचे सर्वत्र स्वागत होत आहे.

'स्वच्छ-सुंदर बीड'चे स्वप्न साकारणार

शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे काढल्यामुळे बीड शहराचे विद्रुप झालेले रूप आता बदलू लागले आहे. यामुळे बीडकरांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, 'बीड शहर स्वच्छ व सुंदर' करण्याच्या मोहिमेला बळ मिळाले आहे. लवकरच या मोकळ्या झालेल्या ठिकाणी अभिमानाने 'ख डींश इशशव' असे फलक लावून शहराचे सौंदर्य अधिक खुलवण्याचा मानस प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.

**काही हितसंबंधियांचा विरोध, पण जनमताचा पाठिंबा**

ही मोहीम राबवत असताना काही मोजक्या लोकांकडून, ज्यांचा अतिक्रमणातून स्वार्थ साधला जात होता, त्यांच्याकडून अंतस्थ कारस्थाने करून विरोध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, शहरातील सुजाण नागरिक आणि चांगले लोक या मोहिमेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. नागरिकांच्या वाढत्या प्रतिसादावरून ही मोहीम बीडकरांच्या हिताची असल्याचे सिद्ध झाले आहे.

**अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या परिश्रमातून मोहीम यशस्वी**

या धडक मोहिमेमध्ये वाहतूक शाखेचे वैभव पाटील, आदिनाथ मुंडे, तांदळे, नारायण वाघमारे, घोलप, थोरात, सचिन वाघमारे, तांबे आणि तरन्नुम शेख यांच्यासह अतिक्रमण विभागाचे पवन, जावेद, बुलडोझर ऑपरेटर अमीर आणि इतर कर्मचाऱ्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या सर्वांच्या समन्वयामुळेच ही कारवाई यशस्वी ठरली असून, बीडकरांनी प्रशासनाच्या या निर्णयाचे




मनापासून कौतुक केले आहे. मुख्य रस्ते मोकळे झाल्याने आता वाहतूक सुरळीत झाली असून, नागरिकांना दिलासा मिळाला आहे. यापुढेही शहराचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी ही मोहीम अशीच सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.






**बीड : राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार गटाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना दैनिक राज्य लोकतंत्र च्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना कार्यकारी संपादक सुभाष चौरे ,उपसंपादक अनिल जाधव, विशाल साळुंखे , व्यवस्थापक दिलीप शिंगाडे, संजय शिंदे व राजेंद्र कामटे**

# गेवराईत बनावट 'सिंधी' निर्मितीचा पर्दाफाश; ४.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील संजय नगर भागात मानवी आरोग्यासाठी घातक असणारी बनावट 'सिंधी' तयार करून तिची विक्री करणाऱ्या एका गुत्त्यावर पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत एका मुख्य आरोपीसह सिंधी पिण्यासाठी आलेल्या सहा ग्राहकांना ताब्यात घेण्यात आले असून, एकूण ४ लाख ७१ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या अनुषंगाने, पान ३ वर



# महिलेचे दीड तोळ्याचे गंठण चोरट्यांनी लांबवले

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बीड रोडवरील कुमार ड्रेसेससमोर एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी लंपास केले. ही घटना मंगळवारी (दि. ३०) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. शहरात भरदिवसा घडलेल्या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.रेणापुरी येथील वर्षा मधुकर आवारे या अन्य एका महिलेसह माजलगाव शहरातील मार्केटमध्ये खरेदीसाठी आल्या होत्या. त्या बीड रोडवरील कुमार ड्रेसेससमोर उभ्या असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण हिसकावून घटनास्थळावरून पोबारा केला. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# हरवलेले २० मोबाईल शोधून मालकांच्या स्वाधीन

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाच्या आधुनिकीकरण मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करत मागील दोन महिन्यांत गहाळ झालेले २० मोबाईल शोधून काढले आहेत. हे सर्व मोबाईल आज त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले, ज्यामुळे तक्रारदारांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

सी.ई.आय.आर. पोर्टलचा प्रभावी वापर

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून बीड पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. या उपक्रमाचा



भाग म्हणून, प्रत्येक पोलीस ठाण्यात 'सायबर डेस्क' स्थापन करण्यात आला आहे. मोबाईल गहाळ झाल्याची तक्रार प्राप्त होताच, पोलीस ऑनलाईन पद्धतीने 'सी.ई.आय.आर.' पोर्टलचा वापर करून त्यांचा शोध घेतात.

सन २०२६ मध्ये आतापर्यंत ४० महागड्या मोबाईलचा शोध

गेवराई पोलीस ठाण्याने या तंत्रज्ञानाचा वापर करून विशेष कामगिरी बजावली आहे. चालू वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत आयफोनसह विविध महागड्या कंपन्यांचे एकूण ४० मोबाईल पोलिसांनी शोधून काढले आहेत आणि ते संबंधित मालकांना परत केले आहेत. मोबाईल हरवल्याच्या तक्रारी स्वीकारण्यापासून ते ते शोधून मालकांपर्यंत पोहोचवण्यापर्यंतची महत्त्वाची जबाबदारी पोकॉ/२१०४ ऋषीकेश पोटे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

तक्रारदारांना मिळाला दिलासा

शेगाव ते गेवराई प्रवासादरम्यान मोबाईल गहाळ झालेले ६७ वर्षीय प्रकाश सर्जेराव कुटे यांचा मोबाईल पोलिसांनी शोधून त्यांना परत केला. आपला महागडा मोबाईल परत मिळाल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त करत पेढे पान ३ वर

# अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने जप्त
# १७ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर धडक मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. या मोहिमेत वाळूची चोरटी वाहतूक करणारा एक पिकअप आणि दोन ट्रॅक्टरसह एकूण १७ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार,



गेवराई पोलीस गस्त घालत असताना त्यांना मिळालेल्या माहितीनुसार खालील कारवाई करण्यात आली:

कोल्हेर रोडवरील कारवाई: दिनांक १ जुलै रोजी पहाटे ५:०० वाजेच्या सुमारास कोल्हेर रोडवरून अवैध वाळू वाहतूक करणारा एक अशोक लेलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप (क्र. चक२३-ण७२८०) पकडण्यात आला. या कारवाईत ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोह/१८२ बिंबिसार डोळस करत आहेत.

हिंगणगाव परिसरात कारवाई: त्याच दिवशी सकाळी ११:०० वाजेच्या सुमारास हिंगणगाव येथील गोदावरी नदीपात्रात छापा टाकून अवैध वाळू उपसा करणारे दोन स्वराज ट्रॅक्टर ट्रॉलीसह जप्त करण्यात आले. हे दोन्ही ट्रॅक्टर विना क्रमांकाचे पान ३ वर

# ज्ञानराधा व तिरुमला प्रकरणातील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे तातडीच्या बैठकीची मागणी

## आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचे निवेदन

आष्टी । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी व तिरुमला प्रकरणातील हजारो ठेवीदारांना त्यांच्या कष्टाची ठेव परत मिळावी, यासाठी आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांना विधानभवन येथे निवेदन सादर करण्यात आले. दि. कुटे ग्रुपच्या जप्त मालमत्तेची एमपीआयडी (चझखऊ) कायद्याअंतर्गत विक्री करून ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात तातडीने उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखा राज्यातील अनेक जिल्ह्यांत कार्यरत असून, विशेषतः बीड व मराठवाड्यातील हजारो ठेवीदारांचे हजारो कोटी रुपये या संस्थेत अडकले आहेत. संस्थेच्या गैरव्यवहारामुळे अध्यक्ष, सचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच काही संचालकांवर गुन्हे दाखल होऊन त्यांना अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला आर्थिक गुन्हे शाखेकडे (एजथ) असलेला तपास प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढे सीआयडीकडे वर्ग करण्यात आला. सीआयडीने मोठ्या प्रमाणावर मालमत्ता जप्त केली असून, त्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने (एऊ) मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात चौकशी करत कोट्यवधी रुपयांची पान ३ वर



# ऐन पावसाळ्यात महिलांचा पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतसमोर ठिय्या

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथे चालु घडीला पाणी उषासी अन कोरड घशासी असी परिस्थिती ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या हलगर्जीपणे मुळे होत आहे. असे ग्रामपंचायत समोर जमलेल्या महिलांनी बोलून दाखवले आहे.

गावात पाणी नाही वेळेवर विज नाही,ही दाद आम्ही कोणासमोर मांडायची यासाठी येथील महीला रिकामे हंडे घेवून ग्रामपंचायत समोर ठिया केला.



सरपंच यांची प्रतिक्रिया घेतली असता त्यांच्या मत आहे की काही तांत्रिक अडचणीमुळे मोटर जळाली असल्यामुळे याची संधी साधून विरोधकांनी ही स्टंटबाजी केली आहे. ग्रामस्थांनी आम्हाला निवडून दिले आहे आणि त्यांची सेवा करणे पान ३ वर

# शैक्षणिक कागदपत्रे अडविल्याने विद्यार्थ्याने पाठविली आर बी अट्टल महाविद्यालयाला वकिलामार्फत नोटीस

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील आर. बी. अट्टल महाविद्यालयाने गणेश राजेंद्र शिंगणे या ग्रामीण विद्यार्थ्याचे बीएससी झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी वारंवार विनंती करूनही टीसी मार्कशीट व इतर कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करीत असल्याने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालयाला पाठविली थेट वकिलाची नोटीस

गणेश राजेंद्र शिंगणे राहणार तलवाडा याने तीन वर्षाच्या बीएससी शिक्षणासाठी रीतसर ॲडमिशन प्रक्रिया करून बीएससी चे शिक्षण पूर्ण करून शेवटच्या वर्षात उत्तीर्ण झाला आहे पुढे विधी शिक्षण घेण्याचे राजेंद्र शिंगणे यांनी ठरविले व विधी शिक्षणासाठी त्यांनी विधी ॲडमिशन पूर्व सीईटी पात्रता परीक्षा दिली त्यामध्ये तो पात्र झाला असून विधी महाविद्यालयांमध्ये विधी शिक्षणासाठी त्याला प्रवेश घेणे आहे यासाठी टीसी मार्कशीट व इतर कागदपत्रे अटल महाविद्यालयकडे जमा आहे यासाठी रितसर अर्ज करून वारंवार विनंती करूनही कागदपत्राची मागणी केली असता त्याला सांगण्यात आले की एबीसी स्कॉलरशिप शासनाकडून महाविद्यालयाला मंजूर झाली नाही कागदपत्रे हवी असल्यास स्कॉलरशिपची फीस भरणा करावी व त्यानंतर कागदपत्रे देण्यात येतील

वास्तविक पाहता राजेंद्र शिंगणे यांनी परीक्षापूर्वी महाविद्यालयाकडून बे बाकी प्रमाणपत्र काढून परीक्षेची फार्मलिटीस पूर्ण केलेली आहे ईबीसी स्कॉलरशिपचा मुद्दा महाविद्यालय व शासनाचा असल्याने माझ्या भवितव्याचा विचार व्हावा व मला माझे विधी शिक्षण प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे देण्यात यावी व माझे शैक्षणिक नुकसान टाळावे अन्यथा आपल्याविरुद्ध सक्षम न्यायालयात रीट पिटिशन दाखल करण्यात येईल असे नोटीसी मध्ये आर बी अटल महाविद्यालयास कळविले आहे यामुळे तालुक्यात व शहरात मोठी चर्चा घडत आहे.

# आष्टी ग्रामीण रुग्णालयातील हाय मॅक्स दिवे ठरले केवळ शोभेची वस्तू!

## लाखो रुपयांचा खर्च; पण एकही दिवा सुरू नाही -रुग्ण, परीसर अंधारात, जबाबदार कोण?

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले आय मॅक्स दिवे आजही बंद अवस्थेत असून, सरकारी निधीचा वापर केवळ कागदोपत्री झाला की काय, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दिवाळीपूर्वी मोठ्या गाजावाजात आणि घाईगडबडीत उभारण्यात आलेले हे हाय मॅक्स दिवे प्रत्यक्षात मात्र आजपर्यंत एकदाही सुरू झाले नसल्याने संपूर्ण प्रकल्पच संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

रुग्णालय परिसर रात्रीच्या वेळी अंधारात बुडालेला असताना लाखो रुपयांचा खर्च करून बसवलेले दिवे केवळ शोभेची वस्तू



बनल्याचे चित्र आहे. त्यामुळे रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

ठेकेदाराचा धक्कादायक खुलासा

या संदर्भात संबंधित ठेकेदाराशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सरकारकडून अद्याप कामाचे कोणतेही देयक अदा झालेले नाही. त्यामुळे यंत्रणा कार्यान्वित करता आलेली नाही.

ठेकेदाराच्या या खुलाशामुळे प्रशासकीय कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मग काम पूर्ण कसे दाखवले?

सरकारी देयकच अदा झाले नसताना काम पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले का? उद्घाटनाच्या घाईत निकृष्ट नियोजन झाले का? लाखो रुपयांचा निधी खर्च करूनही नागरिकांना सुविधा का मिळत नाही? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

रुग्णांच्या सुरक्षेशी खेळ

ग्रामीण रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची ये-जा असते. रात्रीच्या वेळी परिसरात पुरेसा प्रकाश नसल्यामुळे महिला, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26